विनम्र अभिवादन !



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

–संपादक

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

D.S.Nagargoje 8908165555 9175606738

A.S.Nagargoje 9284872700 8007003550

बालाजी बॅटरी हाऊस

सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हीसेस

आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.

पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५१ | शुक्रवार, दि.३ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# पड जमिनी शेतकऱ्यांना परत करणार !

## फडणवीस सरकारचा मंत्रीमंडळ बैठकीत मोठा निर्णय, छोट्या शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**गुरूवार दि.२ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. आकारी पड जमिनी मूळ खातेदारांना परत करण्याचा निर्णय या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० मध्ये सुधारणा करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.**



या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे ४ हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार आहेत. यामुळे छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबतचे सुधारणा विधेयक मांडण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तगाई किंवा तत्सम महसूल न भरल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० नुसार अशा जमिनींचा लिलाव होऊन त्या आकारी पड म्हणून शासन जमा करण्यात येतात. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरील व्याज १२ वर्षाच्या आत भरणा केल्यास ◀◀ पान २ वर

# काश्मीरचे नाव बदलणार !

## गृहमंत्री अमित शहा यांनी दिले संकेत

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**गृहमंत्री अमित शहा यांनी काश्मीरचे नाव बदलण्याचे संकेत दिले आहेत. ते म्हणाले की, काश्मीरचे नाव ऋषी कश्यप यांच्या नावावरून ठेवले जाऊ शकते. पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात त्यांनी ही माहिती दिली.**



अमित शहा म्हणाले, 'कश्मीर पुन्हा एकदा आपल्या भौगोलिक–सांस्कृतिक राष्ट्राचा अविभाज्य भाग बनले आहे आणि भारतासह विकासाच्या मार्गावर आहे. याचा मला आनंद आहे. मला विश्वास आहे की आपण जे काही गमावले आहे ते लवकरच परत मिळवू. काश्मीर हा भारताचा भाग होता आणि ◀◀ पान २ वर

# फडणवीसांचा उज्वल निकमांना फोन; दोन दिवसात होणार नियुक्ती

## संतोष देशमुख खून प्रकरण: आ.सुरेश धसांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांचा होकार



**मुंबई । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणात उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून शासनाने नेमणूक करावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भेट घेऊन केली. त्यास होकार देत मुख्यमंत्र्यांनी अ‍ॅड. निकम यांना फोन करुन बीडच्या घटनेचा खटला लढवण्याबाबत विचारणा केली आहे. निकम यांनी सहमती दर्शवल्यावर दोन दिवसात त्यांची नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.**





संतोष देशमुख खून प्रकरणाचा खटला हा अ‍ॅड. उज्वल निकम यांनी लढवावा, त्यांची विशेष सरकारी वकील म्हणून शासनाने नेमणूक करावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी यापुर्वी सुध्दा केली होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीसंदर्भात पत्रकारांना माहिती दिली. आमदार सुरेश धस हे माध्यमांशी संवाद ◀◀ पान २ वर

### ५ पलंग मागवल्याबाबत मुख्यमंत्र्यांचे स्पष्टीकरण

विरोधक हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याकरता बोलतात, त्यांना प्रसिद्धी हवी आहे. अधिकचे अधिकारी तपासासाठी बीडमध्ये आले आहेत, अधिकची कुमूक तिथं आहे, त्यांना काय रस्त्यावर झोपवणार? असा सवाल विचारत देवेंद्र फडणवीस यांनी बीड पोलिसांनी मागवलेल्या ५ पलंगांवरुन होणाऱ्या विरोधकांच्या टीकेला प्रत्युतर दिले आहे. तसेच, ही वक्तव्ये फक्त प्रसिद्धीसाठी असल्याचेही ते म्हणाले.

### एसआयटीकडून केजमध्ये चौकशी

एसआयटीचे प्रमुख तेली यांच्यासह त्यांच्या पथकाने गुरुवारी केज येथे कृष्णा आंधळे याच्या कुटुंबियांची चार तास चौकशी केल्याचे समजते. या चौकशीनंतर पथक बीडकडे रवाना झाले.

### संतोष देशमुख खून खटला बीडबाहेर चालवा–खा. राऊत

संतोष देशमुख खून खटला जलदगतीने चालवून यामधील आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी होत असतानाच, खटला बीडच्या कोर्टात चालवू नये अशी मागणी पुढे येऊ लागली आहे. जर संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला बीडमध्ये चालला तर न्याय मिळणार नाही. म्हणून हा खटला बीडबाहेर चालवावा, असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खा. संजय राऊत यांनी म्हटले आहे.



# परळीत पोलीसप्रमुख ते तहसीलदार सुद्धा वंजारीच

## अंजली दमानियांकडून धनंजय मुंडे पुन्हा टार्गेट; शेअर केली यादी



मुंबई : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण सुरुवातीपासून लाऊन धरले आहे. बीडमध्ये एका विशिष्ट समाजाचेच अधिकारी का आहेत, असा सवाल उपस्थित करत अंजली दमानिया यांनी परळीतील तहसीलदार, पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी यांची नावेच जाहीर केली आहे. त्यामुळे, आता पुन्हा एकदा बीडमध्ये जातीय समीकरण कसे हाताळले जाते हे समोर आले आहे. दरम्यान, हा समाज वाईट आहे, असे माझे म्हणणे मुळीच नाही. मात्र, त्यांचा फक्त वापर होतोय हे ह्यातले सत्य आहे, असेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

### अंजली दमानियांना जे करायचे ते करु द्या–सदावर्ते

अंजली दमानिया या कोणत्याच घटनात्मक पदावर नाहीत, त्यांना काय बोलायचे आणि काय करायचे ते करु द्या, अशी प्रतिक्रिया गुणरत्न सदावर्ते यांनी व्यक्त केली आहे.



### परळीतील अधिकाऱ्यांची पद व नावे

परळी शहर पोलीस स्टेशन प्रमुख – रवी सानप, परळी ग्रामीण पोलीस स्टेशन प्रमुख – सुरेश चाट, परळी तहसीलदार – व्यंकटेश मुंडे, परळी गटविकास अधिकारी – विठ्ठल नागरगोजे, परळी सह गटविकास अधिकारी – एस एस मुंडे

### बीडच्या फरार आरोपींचे प्रसिद्ध पत्रक जारी

या प्रकरणातील तीन आरोपी सुदर्शन चंद्रभान घुले (वय २६), कृष्णा शामराव आंधळे (वय ३० वर्ष), सुधीर ज्ञानोबा सांगळे (वय २३ वर्ष) हे अद्यापही फरार आहेत. अशातच पोलिसांकडून या बीडच्या फरार आरोपींचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. या प्रसिद्धीपत्रकात सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे यांना फरार घोषीत करण्यात आले आहे. या आरोपींची माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, तसेच बक्षीसही देण्यात येईल असे पोलिसांनी म्हटले आहे. नागरिकांना अवाहन करण्यात येते की, वरील आरोपींचे ठाव ठिकाण कोणास माहिती असेल किंवा फोटोमधील आरोपी दिसून आल्यास त्यांनी संपर्क साधून आरोपीची माहिती कळवावी, माहिती देणाराचे नाव अत्यंत गोपनीय ठेवण्यात येईल आणि योग्य ते बक्षीस देण्यात येईल, असे पोलिसांनी या पत्रकात म्हटले आहे.

### सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : सामान्य प्रशासन विभागाने गुरुवारी (दि.२) १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. उद्योग विभागाचे प्रधान सचिव पदावरून बेस्टच्या महाव्यवस्थापक पदी बदली झालेले ज्येष्ठ सनदी अधिकारी डॉ. हर्षदीप कांबळे यांची आता सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती झाली आहे. ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.०० क्विंटल | २,८०० | २,९८६ | २,८९३ |
| ज्वारी/हायब्रिड: ३४.५० क्विंटल | १,९७१ | २,४०० | २,१५५ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ७३.०० क्विंटल | ६,७०० | ७,५२० | ७,२०२ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,४५१ | ६,४५१ | ६,४५१ |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,६०० | ३,१०० | २,७६७ |
| मुग : २.०० क्विंटल | ६,००१ | ७,००१ | ६,५०१ |
| सोयाबीन:२५१.५० क्विंटल | ३,४०० | ६,८०० | ४,१५५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

## स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडी, एसआयटी व न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू, तपासाला वेग

# पालकमंत्री पदाबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील–धनंजय मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

**स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येतील उर्वरित आरोपींना तातडीने अटक करून या प्रकरणाची चार्जशीट लवकरात लवकर तयार करून हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवले जावे, तसेच या घटनेतील सर्व दोषी आरोपींना फाशीची शिक्षा दिली जावी ही मागणी मी अगदी सुरुवातीपासून करत आलो आहे. या प्रकरणात आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू असून तपासाला वेग आल्याचेही दिसत आहे, असे मत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.**



आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर धनंजय मुंडे हे माध्यमांशी संवाद साधत होते. हत्येतील प्रत्येक दोषी आरोपीला फासावर लटकवले जावे ही माझ्यासह सर्वपक्षीय नेत्यांची मागणी आहे. मात्र त्या आडून मला मंत्रिपदावर ठेवायचे नाही असे म्हणणाऱ्या जिल्ह्यातील काही नेत्यांना तसे का वाटते हे त्यांनाच विचारले पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले आहे. दरम्यान सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशा तीन प्रकारची चौकशी सुरू असल्याने यावरती कोणत्याही राजकीय नेत्याचा कुठल्याही प्रकारचा प्रभाव पडायची काहीही सुतराम शक्यता नसते. याची जाणीव सर्वच लोकप्रतिनिधींना असायला हवी. बाकी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद कोणाला द्यायचे याबाबत आमचे नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले.

# अपहरणकर्त्यांच्या तावडीतून सातवीच्या मुलाने वाचवले मित्राचे प्राण

## केंद्रेवाडी येथील घटना; भरदिवसा दुचाकीवरून अपहरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पाचवीच्या वर्गात शिकणाऱ्या आपल्या मित्राचे अपहरण करून पळून जात असताना अपहरणकर्त्यांचा अर्धा किलोमीटर पाठलाग करून मित्राची सुटका केल्याची घटना तालुक्यातील केंद्रेवाडी येथे सोमवारी (दि.३० डिसेंबर) दुपारी एक वाजताच्या दरम्यान घडली. अर्णव गोरखनाथ तरकसे असे अपहरकर्त्यांच्या तावडीतून आपल्या मित्राची सुटका करणाऱ्या शूर विद्यार्थ्याचे नाव आहे. तो गावातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील सातवीच्या वर्गात शिकत आहे.


सोमवारी वेळा अमावस्या निमित्त गावातील सर्व नागरिक आपल्या शेतात जाऊन भोजनाचा आनंद घेत होते. गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील पाचवीचा विद्यार्थी ऋषिकेश



गणेश केंद्रे (वय ११) हा आपल्या शेतात आई सोबत गेला होता. शेतात ऋषिकेशची आई काम करीत होती तर ऋषिकेश हा एकटाच शेताजवळ उभा होता. यावेळी विना नंबर असलेल्या स्प्लेंडर या दुचाकीवरून दोन व्यक्ती काळे कपडे व तोंडाला रुमाला बांधून आले. त्यांनी ऋषिकेशच्या जवळ जाऊन ◀◀ पान २ वर

# कोणाचे काढून मला मंत्रीपद नकोच

## परदेशातून परतताच छगन भुजबळ यांनी मांडली भुमिका



**नाशिक। प्रतिनिधी**

**भुजबळ मंत्रिपद न मिळाल्याने नाराज होते, विधिमंडळाचे अधिवेशन नागपूरमध्ये सुरु असताना ते नाशिकला आले होते. त्यानंतर ते विदेश दौऱ्यावर गेले होते. विदेश दौऱ्यानंतर छगन भुजबळ आज नाशिकमध्ये दाखल झाले आहेत. यावेळी छगन भुजबळ यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले. कुणाचेही मंत्रिपद काढून घेत मला नको आहे, असे देखशील ते म्हणाले. संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे उदाहरण देत छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली.**

छगन भुजबळ म्हणाले, सावित्रीबाई फुले यांचा उद्या जन्मदिवस आहे, तर आज रात्रीच आम्ही नाशिकला अगोदर त्यांना वंदन करणार आहोत. उद्या सकाळी नायगावला जाणार आहे. २००० पासून दरवर्षी जातोच आणि तिथेच मग मुख्यमंत्री आणि सर्वांचा कार्यक्रम आहे. चाकणमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे पुतळे उभे केले आहेत. त्या पुतळ्यांच्या अनावरणाला शरद पवार साहेब येणार आहेत, मी पण सुद्धा तिथं आमंत्रित आहे, मी तिथं जाणार आहे. पिंपरी चिंचवडला देखील एक कार्यक्रम आहे, तिकडे जाणार असल्याचे छगन भुजबळ म्हणाले.

विदेश दरात मला कुणाचाही फोन वगैरे आले नाहीत. मला आले असले तरी सांगू शकणार नाही. थोडावेळ राजकारणातून डोकं पूर्णपणे बाजूला काढले होते. आयुष्यभर राजकारण करतोच आहे, १९६७ पासून ६६–६७ पासून, राजकीय डोक्याला आराम द्यावा लागतो, असे भुजबळ म्हणाले.

देवेंद्र फडणवीस मला मंत्रिपद किंवा काहीही बोलले नाहीत. सात आठ दिवस थांबा चर्चा करु म्हणाले आहेत. ते काही मला मंत्री करतो म्हणालेले नाहीत. थांबा शांततेने चर्चा करु, असे ते म्हणाल्याचे छगन भुजबळ म्हणाले. शरद पवार – अजित पवार एकत्र येत असतील तर त्याला शुभकामना आहेत, असेही भुजबळ म्हणाले. धनंजय मुंडे यांच्या संदर्भात विचारले असता भुजबळ यांनी वडेट्टीवार काय म्हणतात, जितेंद्र आव्हाड काय म्हणतात त्यावर काय चर्चा करु शकतो. मला मंत्रिपद मिळाले पाहिजे म्हणून कुणाचे तरी काढा असे ◀◀ पान २ वर

अग्रलेख

# दिल्लीत खडाखडी सुरू...

लोकसभा निवडणूक आणि महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यातील विधानसभेची निवडणूक पार पाडल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांचे दिल्ली विधानसभा निवडणुकीकडे लक्ष केंद्रित झाले आहे. राजधानी दिल्लीचे हे मैदान कोण मारणार याबाबत आत्तापासूनच उत्सुकताही निर्माण झाली आहे. दिल्ली विधानसभेत सत्तेवर असणाऱ्या आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल आणि मुख्यमंत्री अतिशी यांनी गेल्या काही कालावधीमध्ये ज्या प्रकारे विविध निर्णयांचा आणि घोषणांचा धडाका लावला आहे आणि या निर्णयांवर टीका करण्याचे काम भाजप आणि काँग्रेस यांनी सुरू केले आहे, ते पाहता आता दिल्लीच्या निवडणूक मैदानामध्ये पैलवानांची खडाखडी सुरू झाली आहे.

सहा-सात महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिल्लीतील सातच्या सात जागा जिंकून भाजपने काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांना जोरदार तडाखा दिला असला तरी विधानसभा निवडणूक भाजपासाठी तेवढी सोपी जाईल असेही नाही. कारण आजपर्यंत दरवेळी लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपने दिल्लीमध्ये चांगली कामगिरी केली असली तरी त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये मात्र भाजपचा पराभव करून आम आदमी पक्षाने सत्ता मिळवली आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये आम आदमी पक्षाच्या प्रमुख नेत्यांना कथित दारू घोटाळा प्रकरणात कारावासाची हवा खावी लागली असल्याने हा विषयही या विधानसभा निवडणुकीमध्ये चर्चेला येणे आणि गाजणे अपेक्षित आहे. भाजपसाठी दारू घोटाळा हा प्रचाराचा महत्त्वाचा मुद्दा जरी ठरणार असला तरी दुसरीकडे अरविंद केजरीवाल यांनी हा मुद्दा निष्प्रभ करण्यासाठी दिल्लीतील सर्वच मतदारांना आकर्षित करण्याचा विचार सुरू केला आहे. आधीच दिल्लीमध्ये वीजपुरवठा मोफत दिला जात आहे. आता अजून काही समाजघटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक घोषणा केजरीवाल आणि मुख्यमंत्री अतिशी यांनी केल्या आहेत. मंदिरातील पुजारी आणि गुरुद्वारातील ग्रंथी यांना १८ हजार रुपये मानधन देण्याची केजरीवाल यांची घोषणा आहे. या व्यतिरिक्त रिक्षाचालकांना दहा लाखांचा विमा देण्याची योजना असो किंवा मुलींच्या शिक्षणाबाबत काही योजना असोत, केजरीवाल यांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये ही निवडणूक जिंकायचीच असा चंग बांधल्याचे दिसून येते. अर्थात ही निवडणूक काँग्रेस सोबत न लढण्याचा निर्णय घेऊन केजरीवाल यांनी इंडिया आघाडीला धक्का दिला असला तरी दिल्ली विधानसभा निवडणुकीचा आजवरचा इतिहास पाहता नेहमीच काँग्रेस, आप आणि भाजप यांच्यामध्ये तिहेरी लढत झालेली आहे. अशा प्रकारच्या लढतीमध्ये आजपर्यंत केजरीवाल यांनाच यश मिळाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे काँग्रेससोबत निवडणूक न लढवण्याचा कोणताही फटका आपल्याला बसणार नाही याची खात्री केजरीवाल यांना असल्यानेच त्यांनी काँग्रेसला बाजूला केले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतील सात जागांवर नजर टाकली तर त्यापैकी सर्व जागा भाजपानेच जिंकल्या असल्याने या सात लोकसभा मतदारसंघातील ६५ विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपची आघाडी आहे, तर पाच ठिकाणी काँग्रेसची आघाडी आहे. आम आदमी पक्षाने कोठेही आघाडी घेतलेली नाही. या आकडेवारीची जाणीवही केजरीवाल यांना असायला हवी. गेली दहा वर्षे सत्तेत असलेल्या केजरीवाल यांच्या आपबाबत सरकारविरोधी भूमिकाही मतदारांच्या मनात तयार झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केजरीवाल सर्वात प्रथम मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना काँग्रेसने पाठिंबा दिला होता आणि आता या केजरीवालांना याच काँग्रेसची मैत्री नको आहे ही गोष्टसुद्धा दिल्लीतील मतदारांच्या मनात राहणार आहे. शीला दीक्षित यांच्यानंतर दिल्लीमध्ये काँग्रेसला कोणताही सक्षम नेता मिळालेला नाही. जो चेहरा पुढे करून काँग्रेस हमखास निवडणुकीत यश मिळवू शकतो असा चेहरा गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये काँग्रेसला सापडलेला नाही. आपने मात्र अरविंद केजरीवाल यांचा चेहरा सातत्याने प्रोजेक्ट केल्यामुळे पक्षाला त्याचा फायदा होताना दिसला. केजरीवाल यांच्यासारखा नेता आणि अतिशी यांच्यासारखा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आणि अनेक घोषणांचा वर्षाव या भांडवलावर ही निवडणूक जिंकण्याचा विश्वास आपला वाटत आहे. दिल्लीतील मतदार आतापर्यंत ठामपणे आणि मोठ्या प्रमाणात केजरीवाल यांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. भाजप आणि काँग्रेस या प्रमुख विरोधी पक्षांची ताकद विधानसभेमध्ये अत्यंत कमी आहे. पुन्हा एकदा अशाच प्रकारचा चमत्कार करण्याची आशा जरी अरविंद केजरीवाल बाळगून असले तरी यावेळी या मैदानामध्ये भाजपानेसुद्धा विविध प्रकारच्या रणनीती आखायला सुरुवात केली आहे. काँग्रेससुद्धा आपल्या अस्तित्वासाठी या निवडणुकीमध्ये चुरशीने उतरणार आहे. साहजिकच २०१५ किंवा २०२० च्या विधानसभा निवडणुकीएवढी ही निवडणूक केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला सोपी जाईल असे गृहीत धरणे चुकीचे ठरणार आहे. केजरीवाल यांना पुन्हा सत्ता मिळवायची आहे, भाजपाला लोकसभा निवडणुकीसारखी कामगिरी दिल्ली निवडणुकीमध्ये करून दाखवायची आहे आणि काँग्रेसला पुन्हा एकदा दिल्लीमध्ये आपले स्थान बळकट करायचे आहे. या सर्व परिस्थितीमुळेच दिल्ली विधानसभेचे मैदान अत्यंत चुरशीचे ठरणार आहे.

# स्त्री शिक्षणाच्या जननी : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

**सातारा जिल्हातील खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' या गावी लक्ष्मीबाई खंडोजी नेवसे पाटील यांच्या पोटी ३ जानेवारी १८३१ रोजी एका कन्येचा जन्म झाला. पुढे या कन्येचे नामकरण 'सावित्री' असे करण्यात आले. त्या काळात बालविवाहाची पद्धत होती. सावित्री ९ वर्षाची असताना तिचा विवाह पुणे येथील जोतीराव गोविंदराव फुले यांच्याशी १८४० मध्ये नायगाव येथे पार पडला. त्या काळात स्त्रीयांना फक्त चुल आणी मुल एवढच काम असायच. स्त्रीयांना शिक्षणाचा हक्क नव्हता; अशा परिस्थितीमध्ये जोतीरावांनी लग्नानंतर सावित्रीबाईंना बाराखडी शिकवण्यास सुरूवात केली.**

सावित्रीबाई आता वाचायला व लिहायला शिकल्या; पुढे मिचेलबाई या नावाच्या शिक्षकेने त्यांची परिक्षा घेवून त्यांना पुढे आणखी शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. १८४५ मध्ये त्यांनी शिक्षकेच्या ट्रेनिंग कोर्सला प्रवेश घेतला. सन १८४७ मध्ये त्यांनी मिचेलबाईंचा नॉर्मल स्कुलमधुन तो कोर्स पुर्ण केला, त्या एक उत्तम शिक्षका बनल्या. १८४८मध्ये जोतीराव अहमदनगरमध्ये गेले असताना त्यांनी तिथे अमेरिकन मिशनद्वारे सुरू असलेल्या शाळा बघितल्या;हे बघुन ज्योतीरावांनी मुलींची शाळा सुरू करायचे ठरवले.पुण्यात तात्या भिडे यांच्या वाड्यात जोतीरावांनी पहिली मुलींची शाळा सुरू केली.परंतु या निर्णयाला ज्योतीरावांच्या घराच्या आसपासच्या लोकांनी विरोध केल्यामुळे जोतीरावांचे वडिल गोविंदराव यांनी जोतीराव व सावित्रीबाई या दांम्पत्याला आपल्या घरातुन बाहेर काढले.त्यानंतर ही शाळा बंद पडली. १८५१ मध्ये जोतीरावांनी पुन्हा आण्णासाहेब चिपळुणकरांच्या वाड्यात मुलींची शाळात सुरू केली.या शाळेची पटसंख्या ४८ इतकी होती. या शाळेच्या मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले ह्या होत्या.सावित्रीबाईंना शाळेत अध्ययन करताना शारिरीक व मानसिक त्रास सहन करावा लागला,पण सावित्रीबाईंनी आपले अध्ययनाचे कार्य सुरूच ठेवले.त्या दारे



खिडक्या बंद करून मुलींना शिकवत असत,तरी देखील समाज कंटक त्या वर्गामध्ये किटके सोडत असत.मुलींना शाळेत सोडतांना पालकांना समाज कंटक त्रास द्यायचे,अश्यावेळी पालक मुलींना पोत्यात घालुन शाळेत पाठवत असत.सावित्रीबाईंच्या निर्धारापुढे शेवटी समाजकंटकांना देखील हात टेकावे लागले.ज्योतीरावांनी सुरू केलेली शाळा पुढे सुरळीत चालु लागली.फुले दांम्पत्यानी विद्यार्थासाठी वस्तिगृहे देखील सुरू केले. पुढे महिला सेवा मंडळ या संस्थेची स्थापना झाली,या संस्थेच्या सावित्रीबाई सचिव बनल्या.या संस्थेतर्फे मकरसंक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रमास सावित्रीबाईंनी सर्व सामाजातील महिलांना आमंत्रित केले.या कार्यक्रमातुन त्यांनी समतेची जोपसना केली.सावित्रीबाईंनी १८५४मध्ये आपला 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला.या काव्यसंग्रहात यांनी ४१ कविता लिहिल्या. १८६३ साली बालहत्या प्रतिबंधकगृहाची सुरवात झाली.या प्रतिबंधकगृहाची सर्व जबाबदारी सावित्रीबाईंवर देण्यात आली, या गृहात त्यांनी ३५ विधवांची बाळंतपणे केली. या गृहातील एका मुलाला सावित्रीबाईंनी दत्तक देखील घेतले. १८६८ मध्ये जोतीबांनी अस्पृशांना पिण्याच्या पाण्यासाठी आपल्या वाड्यातील हौद खुले करून दिले,या क्रांतीकारी निर्णयात सावित्रीबाई देखील त्यांच्या सोबत होत्या. १८७६च्या कोरड्या दुष्काळात त्या निराधारांच्या आधार बनल्या.

१८९० मध्ये सावित्रीबाईंवर दुःखाचा डोंगर कोसळला; पती जोतीराव फुले यांचे आजारपणामुळे निधन झाले. सावित्रीबाईंचा आधार गेला. सावित्रीबाईंनी या दुःखातुन सावरत जोतीरावांचे समाज कार्य पुढे चालु ठेवले. १८९१मध्ये सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या निमित्ताने महात्मा जोतीरावांचे 'अमर जीवन' हे पहिले चरीत्र प्रकाशित करण्यात आले. ज्योतीरावांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची विसावी परीषद सासवड येथे भरवण्यात आली,या परिषदेचे अध्यक्षपद सावित्रीबाईंना देण्यात आले. १८९६मध्ये पुन्हा दुष्काळ पडला,या दुष्काळात देखील सावित्रीबाईंनी लोकांची फार मदत केली. १८९७मध्ये महाराष्ट्रामध्ये प्लेगची साथ आल; या साथीने पुण्यात थैमान घातले. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहिती असुन देखील सावित्रीबाई लोकांच्या मदतीला धावल्या; त्यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाईंचे प्लेग या आजारामुळे निधन झाले. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाच्या जननीचे जगाचा निरोप घेतला.

सावित्रीबाईंचे जीवन एक आदर्शात्मक जीवन होते. त्यांनी महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचा पाया रचला, तसेच त्यांनी अनेक सामाजिक कार्य देखील केले. सावित्रीबाईंनी आपल्या आयुष्यात शिक्षणाचे महत्त्व समाजावून घेत,आधी स्वःत शिक्षण घेत पुढे अनेक मुलींना शिकवले, या कार्यामुळे त्यांना 'क्रांतीज्योती' असे म्हटले जावू लागले. परिस्थिती कितीही प्रतिकुल असली तरी आपण जर प्रयत्न करत राहीलो तर आपल्याला ध्येय प्राप्ती नक्कीच होते,हा महत्त्वाचा विचार त्यांच्या जीवनातुन आपल्याला शिकायला मिळतो. सावित्रीबाईंचा कार्याचा सन्मान म्हणुन महाराष्ट्र शासनाने पुणे विद्यापिठाला सावित्रीबाई फुलेंचे नाव दिले आहे.शेवटी ऐवढेच म्हणावेसे वाटते,'मुलींच्या शिक्षणाचे जिने उघडले दार,तिच सावित्री आहे स्त्री शिक्षणाची शिल्पकार'.

राहुल मधुकर नवपुते
मो.९११२२६१८१७

## धाराशिवमधील त्या सरपंचावर झालेला हल्ला बनावट

### पोलीस तपासात धक्कादायक माहिती समोर

**धाराशिव । प्रतिनिधी**

**बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरून महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापले आहे. यादरम्यान धाराशिवमधील एका सरपंचावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. यामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणाला आता नवे लागले आहे. हा हल्ला बनावट असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.**

राज्यात बीडचे प्रकरण गाजत असताना धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा गावाचे सरपंच नामदेव निकम यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. कदम यांची गाडी अडवून काही गुडांनी त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. गाडीवर पेट्रोल ओतून गाडी जाळण्याचाही प्रयत्न केला, असा दावा निकम यांनी केला होता. मात्र पोलीस तपासात हा हल्ला बनावट असल्याचे समोर आले. निकम यांनी बंदूक परवाना मिळवण्यासाठी हा कट रचला होता. आपल्या काही साथीदारांना हाताशी धरून त्यांनी स्वत:वर हल्ला झाल्याचा बनाव रचल्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी सांगितले आहे. सरपंचावरील कथित हल्ल्याप्रकरणी चार अज्ञात आरोपींविरोधात तुळजापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## वाल्मिक कराडला सोडणाऱ्या गाडीवरुन पवार-मुंडेंना घेरले

### खा. सोनवणे, आ. धसांचा हल्लाबोल; छोटे आका, मोठ्या आकासोबत सगळीकडे होते

**मुंबई । प्रतिनिधी**

**ताफ्यातील एका गाडीवरुन अजितदादांसह धनंजय मुंडे यांना चांगलेच घेरले असून संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची मस्साजोग येथे अजित पवारांनी भेट घेतली त्या वेळी त्यांच्या ताफ्यात जी गाडी होती, त्याच गाडीने वाल्मिक कराड हा पुणे येथे सीआयडीसमोर शरण आला, असा खळबळजनक आरोप खा. बजरंग सोनवणे आणि आ. सुरेश धस यांनी केला आहे. त्यामुळे त्या गाडीवरुन पवार -मुंडेंना विरोधकांनी चांगलेच घेरले असल्याचे दिसते.**

छोटे आका मोठ्या आकांच्या बरोबर सगळीकडे होते. म्हणून मग अजितदादांच्या ताफ्यातही तीच गाडी असणार आहे. तीच गाडी सरेंडर करायला होती. तीच गाडी भेटायला म्हणून केज पोलीस स्टेशनला गेली होती. मला वाटते पांढऱ्या किंवा काळ्या कलरची गाडी होती, असा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. ते मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते. धस यांनी नविन आरोप करीत अजित पवार व धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. तसेच खा. बजरंग सोनवणे यांनी सुध्दा याच गाडीचा उल्लेख करीत अजितदादांच्या ताफ्यातील गाडीनेच कराड बसून आला आणि सरेंडर झाला, असे आरोप केले.





सुरेश धस म्हणाले, बीडच्या लॉकअपमध्ये हे आरोपी ठेऊ नयेत. हे एकतर संभाजीनगरच्या हरसूलला न्यावेत, किंवा नाशिकच्या जेलमध्ये ठेवावेत. कारण हे आरोपींना भेटायला सुविधा द्यायला लागतील. बिंदू नामावलीमध्ये एसटीच्या जागेवर ठराविक प्रवर्गाचे लोक आले आहेत. एस.सी.च्या जागेवरही ठराविक जागेवरचे लोक आलेत. एकाच प्रवर्गाचे लोक जास्त संख्येने अधिकारी कर्मचारी बीड जिल्ह्यात कोणत्याही बाबतीत प्रॉबलेम होऊ शकतो. भविष्यात केससुद्धा दुसऱ्या जिल्ह्यात हलवण्याची वेळ येईल. बजरंग बाप्पांचे सोर्सेस जास्त असतील. एका खंडणी मागणाऱ्या गुन्हेगाराबरोबर राज्यातील मंत्री ज्यांनी गोपनियतेची शपथ घेतलेली आहे. ते तिथं थांबत असतील तर मंत्री म्हणून घ्यायला देखील ते पात्र नाहीत, असेही सुरेश धस यांनी सांगितले.

### मी अजून धनंजय मुंडेंचा राजीनामा मागितलाच नाही

भाजप आमदार सुरेश धस यांच्याकडून आका आणि आकाचा आका अशा शब्दांत निशाणा साधला जात होता. दरम्यानच्या काळात अनेकांनी धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची मागणी केली. यानंतर आता सुरेश धस यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. मी अजून धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला नाही, असे सुरेश धस म्हणाले आहेत. मग सुरेश धस नेमकं कुणावर निशाणा साधत होते? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

### आरोपी बाहेर जिल्ह्यात हालवा

बीडमध्ये चालवावे. पण त्यांना बीडच्या लॉकअपमध्ये ठेवू नये. यांना बीडच्या लॉकअपमध्ये ठेवू नये. एकतर नाशिकला नेण्यात यावे. नाहीतर संभाजीनगरला नेण्यात यावे. मी आता तर त्यांना हलवायला सांगत आहे. मात्र काही वेळाने तर केस दुसऱ्या जिल्ह्यात देण्यात यावी, अशी मागणी सुरेश धस यांनी केली. खंडणी मागणाऱ्या गुन्हेगारासोबत राज्याचे मंत्री सोबत असतील तर त्या पदावर राहण्याची त्यांची ॲबिलिटी नाही, असेही सुरेश धस म्हणाले.

### एसआयटीत बीडचे कर्मचारी का?- खा. सोनवणे

या प्रकरणात एसआयटी बनवली मात्र त्यात बीडमधलेच पोलीस नियुक्त केले. बाहेरचे का निवडले नाहीत, असा सवाल खा. बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केला आहे. वाल्मिक कराड यांचे आत्मसमर्पण ते एसआयटी चौकशी हे सर्वच संशयास्पद वाटत असल्याचेही ते म्हणाले.

## पान १ वरून...

### काश्मीरचे नाव बदलणार !

राहील. राजकीय फायद्यासाठी काहींनी हा भाग वेगळा कसा राहिल यासाठी नेहमीच प्रयत्न केला. पण तो अडथळा आता दूर झाला आहे. दिल्ली येथे बसून इतिहास लिहिला जात नाही. इतिहास प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन समजून घ्यावा लागतो. राज्यकर्त्यांना खूश करण्यासाठी इतिहास लिहिण्याची वेळ संपली आहे. मी भारतातील इतिहासकारांना पुराव्याच्या आधारे इतिहास लिहिण्याचे आवाहन करतो. काश्मीरला ऋषी कश्यप यांची भूमी म्हणून ओळखले जाते, कदाचित त्यांच्या नावावरून काश्मीरचे नाव घेतले गेले आहे, हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

----------

### पड जमिनी शेतकऱ्यांना

मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. तथापि १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा जमिनी मूळ मालकांना परत करण्याची तरतूद कायद्यात नव्हती. त्यामध्ये आता बदल करण्यात येणार आहे. अशा जमिनी प्रचलित बाजारमूल्याच्या २५% रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० मध्ये करण्यास मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली आहे. तसेच या बाबतचे विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. आकारी पड जमिनींसंदर्भातील मोठा निर्णय फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने घेतल्याने छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

-----------

### फडणवीसांचा उज्वल निकमांना

साधत असतानाच देवेंद्र फडणवीस आले, त्यावेळी धस यांनी मागे होऊन मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. गुरुवारी धस यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ॲड. निकम यांची नियुक्ती करण्याची विनंती केली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी थेट निकम यांना फोन करुन खटला लढवण्याबाबत विचारणा केली. बीड हत्याकांडप्रकरणी मी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्याशी चर्चा केली आहे. ही केस त्यांच्याकडे घेण्यास त्यांनी होकार दिला तर दोन दिवसात नियुक्तीबाबत निर्णय घेऊ, असे म्हणत बीडच्या घटनेत उज्ज्वल निकम यांची नेमणूक करण्याबाबत त्यांनी माहिती दिली. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मी भेट घेतली. संतोष देशमुख यांच्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती केली. लगेच मुख्यमंत्र्यांनी उज्ज्वल निकम यांना फोन केला आणि याला तुमची संमती आहे का विचारले, असे सुरेश धस यांनी सांगितले.

---------------

### अपहरण कर्त्यांच्या तावडीतून

त्याच्या तोंडाला हातरुमाल लावला. यामुळे त्यास भोवळ आली आणि अपहरणकर्त्यांनी त्यास दुचाकीवर आडवे टाकून पळवून घेऊन जाऊ लागले. यावेळी शेतात गेलेला अर्णव गोरखनाथ तरकसे (वर्ग ७ वी, वय १३) यांने ऋषिकेश यास ओळखले आणि मोठ्याने आवाज दिला. यावेळी अपहरणकर्त्यांनी आपली दुचाकी पळवण्यास सुरुवात केली. या दुचाकीचा अर्धा किलोमिटर पाठलाग करत व हातात दगड घेऊन एका अपहरण कर्त्याच्या पाठीत घातला व मोठ मोठ्याने ओरडत त्यांच्या मागे धाऊ लागला. समोर रस्ता खराब लागल्याने व अर्णव याचा पाठलाग पाहून अपहरणकर्त्यांनी ऋषिकेश यास जाग्यावर टाकून पळ काढला. अर्णव याने तात्काळ ऋषिकेशच्या अंगातील शर्ट काढून त्याच्या अंगावर पाणी शिंपडले आणि त्याला शुद्धीवर आणले. अर्णव तरकसे याने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे ऋषिकेश केंद्रे यांचे अपहरण होऊ शकले नाही. या घटनेबाबत पिडीत मुलाच्या आईने आडस येथील पोलीस चौकीत जाऊन तक्रार केली असून, पोलीसांनी बुधवारी या घटनेची चौकशी केली आहे.

**अपहरणकर्त्यांचा अर्धा किमी पाठलाग**

अपहरणकर्ते ऋषिकेश यास दुचाकीवर घेऊन जात असल्याचे पाहून अर्णव तरकसे याने मोठ मोठ्याने ओरडत, हातात दगड घेऊन अपहरणकर्त्यांचा पाठलाग केला. दगडांचा होत असलेला मारा व एक दगड एका अपहरण कर्त्याच्या पाठीत लागल्याने त्यांनी मुलास सोडून पळ काढला.

**शाळेत शिक्षकांडून सन्मान**

आपल्या मित्राचे प्राण वाचावण्यासाठी अर्धा किलोमीटर पाठलाग करुन मित्राचे प्राण वाचवल्याबद्दल अर्णव तरकसे याचा जिल्हा परीषद उच्च प्राथमीक शाळेतील मुख्याध्यापक एम. पी. सोळंके, वर्ग शिक्षीका श्रीमती व्हि. एस. गायसमुद्रे, बी. आर. लाखे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षीकांनी सत्कार करुन त्याचे अभिनंदन व कौतूक केले.

दुचाकीवर आलेल्या दोघांनी माझ्या मुलाच्या तोंडाला रुमाल लावत त्याला बेशुद्ध करुन अपहरण करण्याच्या प्रयत्न केला होता. परंतू गावातील सातवीच्या वर्गातील अर्णव (बाल्या) यांने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे माझ्या मुलाची अपहरण टळले.

**- गणेश केंद्रे (पिडीत मुलाचे वडील, केंद्रेवाडी).**

---------

### सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

आठवडाभरातील त्यांची ही दुसरी बदली आहे. लोकसभा निवडणुकीआधी पुण्याच्या जिल्हाधिकारीपदाची जबाबदारी सुहास दिवसे यांच्याकडे सोपवण्यात आली होती. पण केवळ अकरा महिन्यांतच त्यांची बदली करण्यात आली आहे. त्यांची बदली जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख पुणे या रिक्त पदावर नियुक्ती झाली आहे. तर सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पुणे जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज यांची अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवपदी मंत्रालयात बदली झाली आहे. कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांची पर्यावरण व वातावरण बदल विभागाच्या प्रधान सचिव पदी, महसूल आणि वन विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांची बदली उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव पदावर करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन यांची नियुक्ती उद्योग ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवपदी तर एच.एस. सोनावणे यांची नियुक्ती पुणे येथील क्रीडा व युवक सेवा या विभागाच्या आयुक्तपदी करण्यात आली आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची नियुक्ती सातारा जिल्हाधिकारीपदी करण्यात आले आहे. मुंबईतील रुसाचे प्रकल्प संचालक डॉ. निपुण विनायक यांची मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य विभाग सचिव (१), उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांची बदली कृषी व पदुम विभागाच्या प्रधान सचिव पदी करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचे नियुक्ती महसूल व वनविभागाच्या अपर मुख्य सचिव पदी मंत्रालयात झाली आहे.

-----------

### कोणाचे काढून मला

काही माझ्या मनात नाही. तुका म्हणे उगी राहावे, जे जे होईल ते पाहावे हा संत तुकाराम महाराजांचा अभंग सांगत भुजबळ यांनी भूमिका मांडली.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि.०३ जानेवारी २०२५



## अंमळनेर मार्गे पुण्याला जाणारी शिवाई बस दुसऱ्याच मार्गे परत जाते; प्रवाशात नाराजीचा सूर

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या पाहून बीड एस.टी.महामंडळाच्या बीड आगारातून प्रमुख महामार्गाने बीड ते पुणे मार्गावर बीड ते पुणे अशा मोठ्या संख्येने शिवाई इलेक्ट्रिक गाड्या वाकडेवाडी (शिवाजीनगर) सुरू केल्याने प्रवासी वर्गातून स्वागत होऊन समाधान व्यक्त केले जात आहे.बीड आगाराची लिंबादेवी फाटा,निरगुडी,डोंगरकिन्ही, पिंपळवंडी,अंमळनेर,धामणगाव, दौलावडगांव मार्गे सकाळी ६:००,७:०० वाजता बीड आगारातून अहिल्यानगरहुन पुण्याकडे शिवाई इलेक्ट्रिक बस जात आहे.याबद्दल प्रवाशी खुश आहेत,परंतु,प्रवाशांना पुण्याहून याच मार्गे परत जाण्यासाठी ही बस येत नसल्यामुळे प्रवाशी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.पुण्याहून ही बस अंमळनेर मार्गे न जाता अन्य मार्गे जात असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.शिवाई बस पुण्याहून परत बीड कडे जाताना अंमळनेर-पिंपळवंडी-डोंगरकिन्ही मार्गे पाठवावी अशी परिसरातील प्रवाशांकडून मागणी केली जात आहे. तसेच पाटोदा आगाराची पाटोदा ते पुणे ही सकाळी ७:३० वाजता पाटोदा आगारातून सुटणारी बस सुद्धा डोंगरकिन्ही-पिंपळवंडी-अंमळनेर-धामणगाव-दौलावडगाव जिल्हा अहिल्यानगर मार्गावरून जाते.पण परत पुण्याहून येताना अहिल्यानगर, कडा,आष्टी,जामखेड मार्गे जाते.बीड आगाराची शिवाई व पाटोदा आगाराची साधी बस ज्या मार्गे पुण्याला जातात.त्याच मार्गे परत पाठवाव्यात अशी बीड व पाटोदा आगार प्रमुखांकडून प्रवाशी वर्गातून आपेक्षा व्यक्त केली जात आहे.तसेच बीड आगारातून दुपारी १२:३० वाजता सुटणारी याच मार्गावरील बीड-पुणे बस मागील काही दिवसापासून जात नसल्याने प्रवाशांची गैरसोय वाढली आहे.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियानासाठी जास्तीत जास्त विभागांनी प्रस्ताव सादर करावेत -उपजिल्हाधिकारी सुर्यवंशी

**बीड । प्रतिनिधी**

**कार्यालयाने केलेल्या कामाचे मुल्यमापन होण्यासाठी व नाविन्यतापूर्ण अभियान राबविल्याचा गौरव होण्यासाठी शासनाने आपल्यास राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानातुन संधी उपलब्ध करुन दिली असून या अभियानातून बक्षिस प्राप्त होण्यासाठी जास्तीत जास्त कार्यालयाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेश सुर्यवंशी यांनी आज राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठकी प्रसंगी केले.**

शासन दरबारी काम करत असतांना आपल्या कोणत्याच कामाची शासनस्तरावर दखल घेतली जात नाही असा आपला सूर असतो आपल्या बुध्दी कौशल्यातुन विविध प्रकारे कार्यालयीन कामात केलेला बदल,कामाची गतिमानता, कार्यालयाचे सुशोभिकरण, कार्यालयाची अभिमुखता यातुन आपण केलेल्या कामाचा ठसा उपटविण्यासाठी शासनाने आपणस हे अभियान उपलब्ध करुन दिले असल्याचे श्री सुयंवशी यांनी या प्रसंगी उपस्थित अधिकारी ,कर्मचारी यांना सुचित केले. या बैठकीस तहसीलदार तेजस्विनी जाधव, होत डीवायएसपी उमाकांत दस्तुर विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तहसीलदार तेजस्विनी जाधव यांनी प्रस्ताविकात अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक

या लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत तसेच दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-



या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे. स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन () पध्दतीने भरावेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी आवक जावक शाखा सुरु ठेवण्यात आलेली असून ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात तांत्रिक अडचण येत असेल तर आवक जावक विभागात सकाळी ११ ते दुपारी १. ०० पर्यंत संपर्क साधावा किंवा विनायक भावसार यांच्याशी संपर्क साधून तांत्रिक अडचण दूर करावी. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०४९००११०११ यावर संपर्क साधावा.

प्रस्ताव सादर करण्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत. कार्यालयीन व्यवस्थापननामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब.सेवांची गुणवत्ता, दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता. लोकभिमुख्ता. ई गव्हर्नस, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर. तंटा, तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण व पथदर्शी स्वरंपाच्या संकल्पना/ प्रयोग उपक्रम. अ) राज्यस्तरावरील प्रशासकीय कार्यालये तसेच इतर सर्व प्रकारांतील कार्यालयांच्या मुख्यालयांचे प्रस्ताव थेट राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. राज्यस्तरीय निवड समितीव्दारे थेट प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड राज्यस्तरावरच्या पारितोषिकांसाठी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल. ब) त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय निवड समितीकडून दुसऱ्या स्त्रोतातून प्राप्त झालेल्या म्हणजे विभागीय निवड समित्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल. क) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग या तिसऱ्या स्रोताकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी मंत्रालयांसाठी केलेल्या निकषांच्या आधारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल. ड) प्रत्येक महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त दोन प्रस्ताव राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. त्यापैकी राज्यस्तरीय निवड समितीव्दारे पारितोषिकांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल.अशा प्रकारे राज्यस्तरावर एकूण बारा पारितोषिकांचा विचार करण्यात येईल.

## युसुफवडगाव माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत घवघवीत यश



**युसूफवडगाव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील युसूफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अलवर राजस्थान येथे झालेल्या राज्यस्तरीय शोटोकाँन नॅशनल कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.

शोटोकॉन नॅशनल कराटे चॅम्पियनशीप अलवर राजस्थान* येथील स्पर्धेत युसूफवडगाव माध्य.विद्यालय युसूफवडगावच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार कामगिरी करत यशोशिखरावर आपल्या विद्यालयाचा झेंडा रोवून खालील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची गोल्ड सिल्वर आणि ब्रांझ अशी मेडल मिळवलेली आहेत.

ज्यामध्ये खालील विद्यार्थ्यांच्या मेहनतीला यश प्राप्त झालेले आहे.१)कु.खरबड अंकिता जयराज वर्ग आठवा गोल्ड आणि सिल्वर मेडल.२)चि.मोडवे करण विनोद वर्ग सातवा गोल्ड मेडल.३)चि.सावंत संग्राम सुरेश वर्ग सातवा सिल्वर मेडल.४)चि.जोशी संभव लक्ष्मीकांत वर्ग आठवा सिल्वर मेडल.५)चि.लोखंडे सार्थक रत्नलिंग वर्ग सहावा सिल्वर आणि ब्रांझ मेडल.स्वर्गीय द.बा.घुमरे तात्यांच्या स्वप्नातून साकारलेली आणि श्री.दीपकदादा घुमरे यांच्या मार्गदर्शनानुसार चालणाऱ्या या शाळेने ग्रामीण भागात दर्जेदार आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबरच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही उज्वल नावलौकिक करण्याची परंपरा अविरतपणे राखली आहे.यशवंत व गुणवंत विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस आणि शाळेच्या या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था सचिव श्री.दीपकदादा घुमरे संस्थाध्यक्ष श्री.यु.बी.सुकाळे सर संस्था उपाध्यक्ष श्री कल्याण बापू वाणी तसेच सर्व संचालक मंडळ आणि मुख्याध्यापक श्री.भोसले ए.यु,पर्यवेक्षक खरबड.आर.बी तसेच सर्व कर्मचारी वृंद आणि पंचक्रोशीतील सर्व पालक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## वकील संघाच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. शेख ताजुद्दीन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी वकील संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्याने स.ए.न २०२५ साठी नुतन कार्यकारिणीच्या निवडीसाठी निवडणूक घेण्यात आली यामध्ये अध्यक्षपदी प्रथम सहा महिन्यांसाठी अँड.शेख ताजुद्दीन तर दुसर्या सहा महिन्यांसाठी अँड.तुकाराम आडे तर उपाध्यक्षपदी अँड.गजाजन खताळ, सचिव पदि अँड. ऋषिकेश उजगरे यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आलेले आहेत.

वडवणी वकील संघाच्या सन २०२५ साठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला होता यामध्ये दि.३० डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती तर दि.३१ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर अध्यक्षपदासाठी मतदान घेण्यात आले यामध्ये अँड.ताजुद्दीन शेख व अँड.तुकाराम आडे यांना समसमान १५ मते पडली तर एक मतदान बाद ठरविण्यात आले त्यामुळे परत यामध्ये अध्यक्षपदासाठी नाणेफेक करण्यात आली यामध्ये प्रथम सहा महिन्यासाठी ताजुद्दीन शेख तर दुसऱ्या सहा महिन्यासाठी तुकाराम आडे यांची निवड झालेली आहे तर उपाध्यक्षपदी बिनविरोध अँड.गजानन खताळ व सचिवपदी ऋषिकेश उजगरे, कोषाध्यक्षपदि अँड एस.एल.पवार,तर ग्रंथपालपदि अँड ए.एन.काळे यांच्या निवडी झालेल्या आहेत.यावेळी वकील संघाचे अँड.बी.बी.आंधळे, अँड.पि.के.तिडके, अँड.बी.के.तिडके, अँड.पी.व्ही.तिडके, अँड.एन.आर.लंगडे, अँड.एस.ए.लंगे, अँड.एस.ए.शेख, अँड.पि.एस.उजगरे, अँड.एम.डी.गदळे, अँड.व्ही.के.जाधव, अँड.पी.के.शिंदे, अँड.डी.जे.चव्हाण, अँड.के.डी.काळे, अँड.एस.जे.चव्हाण, अँड.एस.पी.डोंबाळे, अँड.बी.डी.उजगरे, अँड.एस.एस.अवचर, अँड.व्ही.बी.लंगे, अँड.व्ही.यु.रोमण, अँड.जे.एस.उजगरे, अँड.एस.ए.कदम, अँड.एस.एस.खिरे, अँड.एम.बी.आडे, अँड.जि.एस.लंगे, अँड.एस.बी.आंधळे, अँड ए.एन.काळे उपस्थित होते.यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून अँड.सुनिल डोंबाळे तर सहाय्यक अधिकारी म्हणून अँड.संजय चव्हाण यांनी काम पाहिले.

# गझल संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दुसरे अ. भा. एल्गार मराठी गझल संमेलन, अंबाजोगाई येथे एक व दोन फेब्रुवारी २०२५ शनिवार व रविवार असे दोन दिवस आयोजित केले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी ख्यातनाम मराठी व उर्दू गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे यांची निवड करण्यात आली आहे. संमेलन स्वागत समितीची बैठकीत ही निवड करण्यात आली. अशी माहिती स्वागताध्यक्ष दगडू लोमटे यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी मराठी व उर्दू भाषेत गझल लिहिल्या असून त्यांची ''शब्द झाले सप्तरंगी'', ''उडवाच मान माझी'' ही मराठी गझलेची पुस्तके प्रकाशित आहेत. ''फूलों के खंजर'' हा हिंदी व उर्दू गझल संग्रह प्रकाशित आहे. डॉ. राम पंडित संपादित मराठी गझल हा ग्रंथ, घर वाऱ्याचे पाय पाऱ्याचे हा ललित संग्रह, कथा नसलेल्या कथा हा कथासंग्रह, बच्चा लोग ताली बजाव हा विनोदी लेखसंग्रह, शायरी नुसतीच नाही हा उर्दू शायर व शायरीचा परिचय ग्रंथ, कुळ कायद्यातील घरठाण हक्क बाबत राहील त्यांचे घर हा ग्रंथ व दैनिक सकाळ मध्ये त्यांच्या पाचशे कथा प्रकाशित झाल्या त्याचे सवाशे बोधकथा एकूण चार खंड असे साहित्य प्रकाशित आहे. गझल व गझलावर व अन्य विषयात महाराष्ट्राभर अनेक व्याख्याने त्यांनी दिली आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनवर गझल व गद्य साहित्य प्रसारित झाले आहे. उर्दू भाषा व लिपी शिकून त्यांनी उर्दू भाषेत रिंद या नावाने गझल लेखन केले आहे. शब्द झाले सप्तरंगी, रेगिस्तान से हिंदोस्तान तसेच गालिब और में या कार्यक्रमातून गझल सादरीकरण केले आहे. कोकण मराठी साहित्य परिषदचे



रत्नागिरी जिल्हा साहित्य संमेलन - रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून सन्मानाने त्यांनी निवड झाली होती. २०२३ साली अकोला येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी गझल संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या लोकराज्य या मासिकाचे ते मुख्य संपादक असताना महत्वाची तेरा पुस्तके प्रकाशित केली.


त्यांचे शिक्षण बी.एस.सी.,बी. एड., एल.एल.बी., एल. एल.एम., एम. बी. ए. व पीचडी झालेले आहेत. सुरुवातीला उपजिल्हाधिकारी म्हणून सनदी नौकरीत रूजू झाले. नंतर सहाय्यक आयुक्त, प्रादेशिक उपायुक्त कोकण विभाग व सामान्य प्रशासन, ठाणे महापालिका उपआयुक्त, सांस्कृतिक उपसचिव, अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी, महासंचालक माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मृदू व जलसंधारण खात्याचे सचिव, विभागीय आयुक्त अमरावती येथून ते निवृत्त झाले. आता ते महाराष्ट्र लोक सेवा आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेवून नियोजित दुसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन अंबाजोगाईच्या संमेलनाध्यक्षपदी निवड केली आहे अशीही माहिती स्वागताध्यक्ष दगडू लोमटे यांनी दिली. बैठकीस स्वागत समितीचे कार्याध्यक्ष डॉ . शुभदा लोहिया, सचिव गोरख शेंद्रे, कोषाध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष निशा चौसाळकर, डॉ. शैलजा बरुरे, सहसचिव अभिजीत जोंधळे, संतोष मोहिते, आदी सदस्य उपस्थित होते. अंबाजोगाईच्या साधना सेवाभावी संस्थेने हे संमेलन घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे. रसिक, गझलकार व अंबाजोगाईकर यांच्या संयुक्त आर्थिक सहकार्यातून हे संमेलन घेण्यात येत आहे. हे संमेलन फेब्रुवारी महिन्यात १ व २ तारखेला योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नागापूरकर सभागृहात संपन्न होणार आहे. या संमेलनाची तयारी सुरू असून. महाराष्ट्र व बाहेर राज्यातून ३०० गझलकार सहभागी होणार आहेत. पाहिले संमेलन अमळनेर येथे पार पडले होते. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ गझलकार व अभ्यासक शिवाजी जवरे हे होते.

## मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहास उपस्थित राहण्याचे श्री गुरु मानूरकर महाराज यांचे आवाहन

मानूर । प्रतिनिधी

लिंगैक्य श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांचे १९ वा पुण्यस्मरण सोहळा निमित्त श्री नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा शनिवार दिनांक ०४ जानेवारी ते दिनांक ११ जानेवारी २०२५ या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे लिंगैक्य श्री गुरु गिरी शिवाचार्य महाराज मानूरकर यांनी सन २००८ पासून सर्व शिष्य सदभक्तांच्या सहभागातून सुरू केलेला अखंड शिवनाम सप्ताह प्रति वर्षीप्रमाणे यावर्षीही होणार आहे. तरी सर्व शिष्य भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून या अखंड शिवनाम



सप्ताहाचा लाभ घ्यावा. मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहामध्ये दैनंदिन कार्यक्रम सकाळी ७ ते १२ सद्गुरु नागनाथ महाराज व गुरुदेवता समाधीस नित्य पूजा व लघु रुद्राभिषेक, सकाळी ९ ते ११ ग्रंथराज परमरहस्य पारायण, दुपारी ११ ते १२ आशीर्वचन, दुपारी १२.३० ते ३ प्रसाद, दु. ३ ते ४ गाथा भजन, ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ७ शिवपाठ, रात्री ७ ते ९ प्रसाद, रात्री ९ ते ११ शिवकीर्तन यानंतर रात्री ११ शिवजागर.. अशाप्रकारे श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थान मानूरचे लिंगैक्य श्री गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांचे १९ वे पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त शिवनाम सप्ताहाचे आयोजन मानूर मठाचे विद्यमान मठाधिपती श्री ष ब्र १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज व सर्व शिष्य सदभक्त व मानूर ग्रामस्थांच्या सहभागातून होत आहे. तरी जहागिरदार मठसंस्थानचे सर्व शिष्य सदभक्त व समाजाने या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री गुरु मानूरकर महाराज व मानूर ग्रामस्थांनी केले आहे.

## आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय येथे उत्साहात साजरा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय ध्यान दिवस म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने नुकतेच २१ डिसेंबर हा दिवस निवडला आहे त्या अनुषंगाने आई प्रतिष्ठाण अंबाजोगाई संचलित जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय अंबेजोगाई येथे ध्यान दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

पतंजली योग समिती आंबेजोगाई आणि आई प्रतिष्ठाण अंबाजोगाई संचलीत जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालया चे अध्यक्ष ॲड जयसिंग चव्हाण आणि अजित माने यांच्या नेतृत्वाने विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून योग ध्यानाचा संदेश देण्यासाठी परिसरातील विविध भागांमध्ये विद्यार्थ्यांनी जोरदार फलकावरील संदेश वाचून सर्व परिसर योगमय केला होता फलकावरती ''करो योग रहो निरोग'', घर घर जायेंगे...सबको



योग सिखायेंगे...!!! हमारी शान... भारत स्वाभिमान,'' वसुदेव कुटुंबकम'' अशा अनेक संदेश फलकाने सर्व वातावरण योगमय आणी ध्यानमय केले होते याप्रसंगी पतंजली योग समितीचे कर्मठ योगशिक्षक तथा स्वातंत्र्य सैनिक योगशिक्षक श्री. दत्ताची लांब यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून योग, प्राणायाम, ध्यान, भारतीय चिकित्सा पद्धती, खानपान याविषयी विद्यार्थ्यांना योग सत्रामध्ये सविस्तर प्रशिक्षण दिले आणि आज पतंजली योग समितीचे योग प्रभारी श्री. धनंजय इंगळे यांनी ध्यान दिवसाच्या शिबिराची सांगता केली यावेळी त्यांनी आपल्या संदेशामध्ये ध्यानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि पुढील काळामध्ये ध्यानअत्यंत महत्त्वाचे आहे हे विशद केले. ध्यानाने मनाची एकाग्रता वाढते ध्यानाने मनाची पवित्रता वाढते तसेच संकल्प शक्ती वाढते यामुळे जीवनामध्ये सफल व यशस्वी नागरिक घडण्यासाठी मदत होते असे सांगितले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अंजली लोहिया सर्व शिक्षक वृंद तसेच शाळेतील विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

पान ६ वरून...

### रुई धारूर ग्रामस्थांकडून

यामध्ये मस्साजोग येथील झालेल्या घटनेचा निषेध करून स्वर्गीय संतोष देशमुख कुटुंबाला मदत करण्याचे गावकऱ्यांच्या वतीने आव्हान करण्यात आले. या आव्हानाला प्रतिसाद देत या छोट्याशा रुई धारूर गावामधून बघत बघत १ लाख ५ हजार ५५५ रुपये जमा झाले. जमा झालेली मदत २ जानेवारी बुधवार रोजी केज तालुक्यातील मस्साजोग येथील स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला स्वाधीन करण्यात आली. यावेळी रुई धारूर येथील नितीन पाटील, आबासाहेब काकडे, संतोष नांदुरे ,रमेश सोळंके, शिवाजी कदम, बालासाहेब थोरात, हनुमंत जाधव, बापू सोळंके, केशव वाघमारे ,बाळासाहेब भोसले, गोविंद गिरी ,श्रीनिवास सोळंके ,अक्षय पाटील ,अमर सोळंके, वैभव सोळंके, किरण सोळंके, आशिष पाटील बबलू सोळंके आनंद पाटील सुधीर सोळंके सह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

व पंचायत समिती मधील सर्वसामान्य नागरिकांचे कामे होत नाहीत प्रत्येक कामासाठी अडवणूक केली जाते, शासनाच्या विविध योजना चा नागरिकांना लाभ घेण्यासाठी चिरीमिरी घेतल्याशिवाय कर्मचारी कामच करत नाहीत शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना थेट अधिकाऱ्यांशी संबंध येत नसल्याने कर्मचारी सामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचे प्रकार धारूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे शहरासह तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक व प्रशासन यांच्यामध्ये कुठलाच सुसंवाद नसल्याचे दिसते तसेच अधिकारीही अपवादानेच कार्यालयात आढळतात

विविध कामांचा पाठपुरावा होत नसल्याने प्रशासकांची मनमानी वाढली आहे. अशिक्षित गोरगरीब जनतेला न्याय मिळणे कठीण झाले आहे नगरपरिषद सदस्य, जि.प, पं.स सदस्य असल्यास सर्वसामान्यांच्या प्रश्न सोडवण्यासाठी मदत होते.

### संत भगवानबाबा पुण्यतिथी

तरुणांमध्ये कुस्तीची क्रेझ वाढत आहे. धारूर तालुक्यातील हिंगणी, देवदहिफळ, कासारी, कोयाळ, तेलगाव ,चाटगाव, जवळा, जिवाचीवाडी या गावातील मल्ल राज्य पातळीवर कुस्तीचा खेळ खेळत आहेत. सोशल मीडियाच्या जमान्यात अंगमेहनतीचे खेळ खेळणारी ही तरुण मंडळी नव तरुणांसाठी प्रेरणा असल्याचे मत महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान यांनी व्यक्त केले. कांदेवाडी येथे शंभर रुपयांपासून पाच हजार एक रुपयांचे बक्षीस जिंकणाऱ्या मल्लास आयोजकांनी मानधन दिले. अनेक रोमांचकारी सामने या दंगलीत पाहायला मिळाले. लक्ष्मण करे,रामा तिडके,साजन घुगे, विवेक शेंडगे, सिध्देश्वर बडे, महेश सोनवणे,बाळू तोंडे यांची झालेली कुस्ती विशेष रोमांचकारी होती. कुस्त्यांच्या फडातील शेवटची दंगल लखन बडे देवदहिफळ व बाळनाथ चौरे यांच्यात बरोबरीची सोडण्यात आली, स्व.शिवाजी रामभाऊ खाडे स्मृती पित्यर्थ संस्था अध्यक्ष प्रदीप खाडे यांच्या वतीने सन्मान चिन्ह व रुपये आठ हजार बक्षीस स्वरूपात दोघांना विभागुन देण्यात आले. येथील योगीराज खाडे, महाराष्ट्र चॅम्पियन सुनील बडे,महाराष्ट्र चॅम्पियन अंगद शेप, माऊली खाडे, पंकजाताई मुंडे अंगरक्षक गणेश खाडे, गोपीनाथ कांदे, पिंटू कांदे, सतीश कांदे, गोपीचंद कांदे, विष्णू खाडे, फुलचंद कांदे, नवनाथ लटपटे , विनायक खाडे या पंचांनी कुस्तीच्या दंगलीत पंच म्हणून काम पाहिले. परशुराम कांदे, ऋषिकेश कांदे, माणिक फुंदे,सुदाम कांदे अकुश कांदे, विकास खाडे, पप्पू कांदे, ओंकार कांदे,आदिनाथ कांदे,हनुमंत कांदे,अनिल खाडे यांनी दंगलीचे नियोजन केले.महादेव मुजमुले, हनुमान भोसले यांनी आपल्या पहाडी आवाजात केलेले सूत्रसंचालन सर्वांचे लक्ष वेधत होते. या कुस्ती दंगलीस राज्य भरातील मल्लांसह प्रेक्षकांची लक्षणीय गर्दी होती. दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सहा. पो.निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांच्यासह पोलिसांनी या दंगलीचा बंदोबस्त देत स्पर्धा शांततेत घडवून आणल्या.

### प्रसेनजित शिंदे ठरला मितीचा

आपले मनोगत व्यक्त केले. तर लेखक आर. प्रकाश यांच्या लेखणीचा स्पर्श असलेल्या डियर रिव्हर (प्रिय नदीस) चे छायांकन व संकलन अमर देवणे यांचे असुन यातील इतर कलावंत पूजा देढे, बद्रीनाथ खंडागळे, भिमराव घोडेराव आहेत. तसेच सुभाष कांबळे, सौरभ धापसे, निकेश भांगे इत्यादीनी तांत्रिक बाजू सांभाळली आहे. चि प्रसेनजीत शिंदे च्या यशा बद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे

### शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी न

पिक काढणे साठी हि बँक अडवणूक करत आहेत तरी वडवणी तालुक्यातील लोणवळ येथील सीसीआय कापूस खरेदी दररोज सुरू करावी तसेच वडवणी येथील सोयाबीन खरेदी केंद्राला बारदाना (पोते) तात्काळ उपलब्ध करावा. तसेच भारतीय स्टेट बँक व महाराष्ट्र बँके मार्फत शेतकऱ्यांची आडवणुक न करता त्वरीत पिक कर्ज वाटप करावे नसता दि.६ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता बीड परळी हायवे रोड छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेतकऱ्यांना सोबत घेऊन रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा तहसीलदार व पोलिस निरीक्षक वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे बाजार समिती संचालक सचिन लंगडे, बजरंग साबळे, अभिमान कदम व इतरांनी दिला आहे.

### शासकीय सोयाबीन हमीभाव

सोयाबीन कमी भाव असल्यामुळे विक्री केली नाही याचा परिणाम तालुक्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरामध्ये सोयाबीनच्या थाप्या पडलेल्या दिसत असून घरामध्ये बसण्यासाठी देखील जागा शिल्लक नाही या गोष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन या मालाला योग्य भाव मिळावा यासाठी लोकनेते आ.सुरेश आण्णा धस यांनी विशेष प्रयत्न करून पाटोदा तालुक्यामध्ये तिन आणि शिरूर तालुक्यामध्ये एक अशी चार शासकीय हमीभाव केंद्र सुरू केली आहेत त्याची प्रत्यक्ष खरेदी सुरू आहे यासाठी सोयाबीनची ऑनलाईन नोंदणी सुरू असून नोंदणी ६ जानेवारी २०२५पर्यंत चालू राहील या दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या सोयाबीन ची ऑनलाईन नोंदणी करण्यात यावी.

या शासकीय हमीभाव केंद्रावर ४८९२/- रुपये प्रतिक्विंटल सोयाबीनचे दर मिळणार असून यासाठी शेतकऱ्यांनी २०२४-२५ या वर्षीचा सोयाबीन पेरा नोंदणी असलेला सात बारा,आठ अ चा उतारा,आधार कार्ड ची झेरॉक्स तसेच राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाचे झेरॉक्स प्रत. घेऊन खालील मोबाईल नंबर ला संपर्क करा कुसळंब-९४२०१६२१६८(गर्जे सागर),पाटोदा-९९७५५११३२२(वीर प्रकाश),शिरूर कासार- ९४२३१६८७५५(शिवाजी बडे),नागरेवाडी (शिरूर)-७३८७४४७२८७(अशोक डोके ) या नंबरला संपर्क करून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा चे सभापती किरण शिंदे पाटील यांनी केले आहे.

### तांबाराजुरी जि.प.केंद्रीय

या बाजाराचे नियंत्रण केले.मुलांनी आपल्या शेतातून आणलेला भाजी-पाला कांदे,बटाटे ,कोथिंबीर, टोमॅटो, भेंडी, गवार, लसूण, पेरू, लिंबू, केळी यासह खाद्यपदार्थांमध्ये दही धपाटे, शाबु वडे, वडापाव, मसाला पापड, पोहे, भजे,बिस्किट, चॉकलेट, चिक्की आदी पदार्थ विद्यार्थ्यांनी बाजारात विक्रीसाठी ठेवले होते.बाजारातून गावातील महिला व पुरुष, पालक, ग्रामस्थ यांनी आवर्जून लहान मुलांकडून खरेदी केली.यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री बबन पवार सर, केशव तांबे, विकास तांबे ग्रा पं सदस्य, विलास तांबे, धनंजय तांबे, विकास तांबे, दत्ता तांबे, जयदत्त तांबे, काका घालमीले, माऊली नेमाने आदी ग्रामस्थांनी बाजाराला भेट देऊन मुलांचे कौतुक करून खरेदी केली. तसेच महिलांची उपस्थिती विशेष होती, सर्व महिलांनी चिमुकल्यांकडून खरेदी केली.यावेळी बोलताना मुख्याध्यापक सोंडगे सर म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी शिक्षकांच्या संकल्पनेतून आठवडी बाजार उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांना खरोखरच खूप काही शिकायला मिळते. सोबतच गणित विषयाशी निगडित अन्य व्यावहारिक ज्ञानही त्यांना मिळते.शाळेमध्ये विविध उपक्रम आम्ही नेहमीच राबवत असतो,यापुढेही राबवले जातील असे मुख्याध्यापक सोंडगे सर यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी तांदळे सर, अनिकेत तांबे सर, गाडेकर मॅडम,राठी मॅडम यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# रब्बी हंगामात ६१४ लाख हेक्टरवर पेरणी; तेलबिया पिकांखालील क्षेत्र पिछाडीवर

पुणे : यंदाच्या रब्बी हंगामात देशातील ६१४ लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयाने सोमवारी (ता.३०) दिली आहे. यामध्ये सर्वाधिक पेरणी क्षेत्र गव्हाखालील आहे. तर हरभरा, मसूर, वाटाणा, उडीद, मूग या कडधान्य पिकांचं क्षेत्र आघाडीवर असल्याची आकडेवारी केंद्रीय कृषी मंत्रालयाने प्रसिद्ध केली आहे. परंतु रब्बी तेलबिया पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र पिछाडीवर गेल्याचं केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

रब्बी हंगामात मोहरी, भुईमूग, सूर्यफुल, करडई, तीळ, जवस, या तेलबिया पिकांची लागवड केली जाते. गेल्यावर्षी रब्बी हंगामात देशभरात १०१.३७ लाख हेक्टरवर तेलबिया पिकांची लागवड करण्यात आली. यंदा मात्र रब्बी हंगामात मात्र ९६.१५ लाख हेक्टरवरच तेलबिया पिकांची लागवड करण्यात आल्याचं केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या रब्बी पेरणी अहवालाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. देशातील एकूण गरजेच्या सुमारे ६० ते ६५ टक्के खाद्यतेल आयात केली जाते. त्यामुळे केंद्र सरकार तेलबिया मिशन राबवून तेलबिया पिकांखालील क्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा दावा करत आहे. यंदा देशात मान्सून हंगामात चांगल्या पावसाने हजेरी लावली होती. त्यामुळे रब्बीत तेलबिया लागवडीला शेतकरी पसंती देतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. परंतु केंद्र सरकारच्या धोरण धरसोडीमुळे तेलबिया उत्पादकांना आर्थिक झळ बसत आहे. परिणामी शेतकऱ्यांनी रब्बी तेलबिया पिकांकडे पाठ फिरवत आहे. यामध्ये मोहरीचं क्षेत्र सर्वाधिक पिछाडीवर आहे. गेल्यावर्षी रब्बी हंगामात मोहरी ९३.७३ लाख हेक्टरवरील क्षेत्र यंदा ८८.५० टक्क्यांवर आहे. देशात गेल्यावर्षी ३१३ लाख हेक्टरवर गव्हाची पेरणी झाली होती. परंतु यंदा मात्र गव्हाच्या पेरणी खालील क्षेत्र ३१९.७४ लाख हेक्टरवर पोहचल्याचं केंद्रीय कृषी मंत्रालयाने सांगितलं आहे. त्यामुळे डिसेंबर अखेर गहू लागवडीने आघाडी घेतली आहे. तर भात पिकाखालील क्षेत्र गेल्यावर्षी १३.६१ लाख हेक्टरवरून यंदा १४.९७ हेक्टरवर पोहचलं आहे. कडधान्य पिकांमध्ये सर्वाधिक हरभरा पेरणी झाली आहे. यंदाच्या रब्बी हंगामात हरभराखालील क्षेत्र ९३.९८ लाख हेक्टर आहे. तर गेल्यावर्षी हरभरा पिकाखालील क्षेत्र ९३.१७ लाख हेक्टर होतं. परंतु सरासरीच्या तुलनेत हरभरा पिकाखालील क्षेत्र पिछाडीवर असल्याचं दिसतं.



### मक्याखालील क्षेत्रात आघाडी

देशातील एकूण मका पिकाखालील क्षेत्र गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा आघाडीवर आहे. गेल्यावर्षी रब्बी हंगामात १७.५३ लाख हेक्टर क्षेत्र मका पिकाखाली होतं. यंदा मात्र त्यामध्ये आघाडी घेत मका पिकाखालील क्षेत्र १८.९३ लाख हेक्टरवर पोहचले आहे, असंही केंद्रीय कृषी मंत्रालयाने पेरणी अहवालात सांगितलं आहे.

**भरडधान्यात घसरण :** ज्वारी, बाजरी, नाचणी या भरडधान्य पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने श्री अन्न असं भरडधान्य पिकांचं नामाकरण केलं. तसेच राष्ट्रीय आणि जागतिक भरडधान्य वर्ष साजरी केली. परंतु ज्वारी पिकाखालील क्षेत्र पिछाडीवर आहे. ज्वारी पिकाखालील क्षेत्र गेल्यावर्षी २२.५२ लाख हेक्टर होतं. यंदा मात्र ३० डिसेंबरपर्यंत ज्वारी क्षेत्र २२.२४ लाख हेक्टरवर आहे. तर बाजरी पिकांखालील क्षेत्र गेल्यावर्षीच्या ०.१४ लाख हेक्टरवरून ०.१२ लाख हेक्टवर घसरलं आहे. तसेच नाचणी पिकाखालील क्षेत्रातही गेल्यावर्षीच्या तुलनेत पिछाडी आहे. गेल्यावर्षीच्या ०.५८ लाख हेक्टरवरून नाचणी पिकाखालील क्षेत्र चालू रब्बी हंगामात ०.४९ लाख हेक्टरवर घसरले आहे. दरम्यान, केंद्र सरकारकडून तेलबिया, कडधान्य, भरडधान्य पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी मिशन राबवली जात आहेत. परंतु दुसरीकडे मात्र केंद्र सरकारच्या धोरण लकव्याने शेतकरी जेरीस आले आहेत. परिणामी शेतकरी केंद्र सरकारच्या आवाहनाकडे पाठ फिरवत असल्याचे चित्र आहे.

# शास्त्रज्ञांनी विकसित केला गीर गाईचा देसी क्लोन आता गावागावात दूध उत्पादन वाढणार

पुणे : कर्नालच्या नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूटने देशात प्रथमच देशी जातीच्या गिरचे क्लोन केलेले मादी वासर विकसित केले आहे. या क्लोनच्या विकासामुळे आता दुधाचे उत्पादन वाढेल. याशिवाय आता हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि बिहारमधील शेतकरी गुजराती गीर गायींचे पालन करू शकतात. या जातीच्या गायी सामान्य देशी गायींपेक्षा जास्त दूध देतील असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

एनडीआरआयने क्लोन केलेल्या गिर मादी वासराचे वजन ३२ किलो असल्याचे म्हटले आहे. तिला गंगा असे नाव देण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा क्लोन राष्ट्रीय दुग्ध संशोधन संस्था, कर्नालच्या एका प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आला आहे. ही संस्था गीर आणि साहिवाल सारख्या देशी गायींच्या क्लोनिंगवर काम करत आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, थारपारकर, गीर, साहिवाल आणि रेड-सिंधी या देशी गायींचा दूध उत्पादनात महत्त्वाचा वाटा आहे. यामुळे भारतीय डेअरी उद्योगाला विस्तार मिळेल.

विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार दूध उत्पादन वाढवण्यासाठी हा क्लोन तयार करण्यात आला आहे. एनडीआरआय २०२१ पासून त्यावर काम करत आहे. ते गिर, रेड सिंधी आणि साहिवाल यांसारख्या उच्च दूध देणार्या देशी जातींच्या क्लोनिंगवर काम करत आहेत. तब्बल २ वर्षांनंतर ला यात यश मिळाले आहे. यासाठी एनडीआरआयने उत्तराखंड पशुधन विकासाशी भागीदारी करून त्यावर काम सुरू केले.



एनडीआरआयचे प्रमुख डॉ. धीर आयबाग यांनी सांगितले की, गीर गायी प्रचंड उष्णता आणि थंडी सहन करू शकतात. त्यांच्यात रोगांशी लढण्याची क्षमताही अधिक असते. त्यामुळे ते कमी आजारी पडतात. परदेशातही त्यांना खूप मागणी आहे. ब्राझील, अमेरिका, मेक्सिकोसह अनेक देशांतून दूध उत्पादनासाठी गीर गायीची आयात केली जाते. डॉ. धीर आयबाग यांनी सांगितले की, डॉ. नरेश सेलोकर, अजय अस्वाल, एसएस लथवाल, सुभाष कुमार, मनोज कुमार सिंग, कार्तिकेय पटेल, रणजीत वर्मा आणि एम.एस. चौहान यांच्या नेतृत्वाखालील शास्त्रज्ञांच्या चमूने हा क्लोन तयार करण्यासाठी २ वर्षे काम केले.

# शेळीच्या दुधापासून बनवा खवा, पनीर, चीज


आपल्या देशात गाई आणि म्हशीच्या दुधाला मोठी मागणी आहे. यामुळे अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायासाठी याची निवड करतात. असे असताना शेळीच्या दुधास येणारा विशिष्ट गंध हा काप्रिक, कापरायिड आम्लामुळे येतो. हा गंध काही प्रमाणात नियंत्रित करता येतो, आपल्या भागात नेहमीच तयार करण्यात येणारे दुग्ध पदार्थ जसे की, चक्क्का, श्रीखंड, लोणी, दही, ताक शेळीच्या दुधापासून तयार करता येऊ शकतात.

हे पदार्थ आरोग्यास हितकारक व पौष्टिक आहे. गाईच्या दुधापेक्षा शेळीच्या दुधाचे गुणधर्म भिन्न आहेत. स्निग्ध पदार्थांच्या कणाचा लहान आकार, उच्च तापमानावर कमी स्थिरता, त्यापासून घट्ट व खवलेदार ही तयार न होणे आणि एक विशिष्ट प्रकारचा गंध शेळीच्या दुधास आहे. परंतु नविन प्रक्रिया तंत्रज्ञानामुळे शेळीच्या दुधापासून पनीर, चीज, इत्यादी पदार्थ तयार करता येतात. खवा हा इतर पदार्थांसाठी कच्चा माल असल्यामुळे चांगली मागणी असते. पेढा, बर्फी, गुलाबजाम हे पदार्थ बनविण्यासाठी खव्याचा वापर करतात.

अन्न प्रतिबंधक कायद्यानुसार खव्यामध्ये स्निग्धतेचे प्रमाण कमीत कमी २० टक्के असावे. शेळीच्या दुधापासून बनवलेल्या खव्याला एक विशिष्ट प्रकारचा गंध येतो. तो घालविण्यासाठी किंवा त्याची तीव्रता कमी करण्याच्यादृष्टीने खवा बनविताना त्यामध्ये थोडच्या प्रमाणात (खव्याच्या प्रमाणात ०.२%) जायफळ पूड मिसळावी.

शेळीच्या दुधापासून पनीर हा एक पौष्टिक पदार्थ सहजरीत्या बनविता येतो. बांदल चीज किंवा सुरती पनीर हा रेनेट आणि विरजण वापरून तयार केलेला मऊ चीझचा प्रकार आहे. ताजे दूध, मलई आणि पावडर या घटकांच्यापासून आइस्क्रीम तयार केले जाते. हे तयार करण्याची प्रक्रिया आणि पद्धती ढोबळमानाने नियमित आइस्क्रीम सारखीच आहे. युरोपमध्ये शेळीच्या दुधापासून बनवलेल्या चीजच्या काही प्रकारास अतिशय मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ग्रीस आणि फ्रान्स या देशात मोठ्या प्रमाणावर शेळीच्या दुधापासून चीज निर्मिती होते. पिझ्झा खाणाऱ्या लोकांच्याकडून मोझरेला चीझची मागणी वाढत आहे. मोझरेला चीज हा पिझ्झाचा अविभाज्य घटक आहे. शेळीच्या दुधापासून मोझरेला चीज हा एक उत्तम पर्याय आहे. शेळीचे दूध आणि म्हशीचे दूध ५० : ५० या प्रमाणात वापरून बनवलेले मोझरेला चीज आर्थिकदृष्टीने फायदेशीर ठरते. यामुळे शेतकऱ्यांना हा देखील एक चांगला पर्याय आहे.





# राजगिरा लागवड तंत्रज्ञान

उपवासासाठी राजगिरा अतिशय महत्त्वाचा आहे. आरोग्यदृष्ट्याही राजगिरा महत्त्वाचा आहे. राजगिरा हे आहार शास्त्रानुसार सुपर फूड मानले जाते. राजगिराची लागवड करून शेतकरी फायदेशीर शेती करू शकतात. महाराष्ट्रातील शेतकरी अद्याप राजगिरा शेतीबाबत जागरूक नाहीत. अनेकांना त्याची लागवड कशी करतात अन काय भाव मिळतो याचीही माहिती नसते मात्र त्याची माहिती करून घेतल्यास याचा चांगला फायदा होतो.

उत्पादन : सुधारित तंत्राचा वापर केल्यास प्रति हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पादन मिळते. जातीनिहाय उत्पादनामध्ये फरक पडत असल्याने अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवडीसाठी शेतकऱ्यांनी निवड करावी. महात्मा फुले कृषी विद्यापीठाने राजगिरा पिकाची अधिक उत्पादन देणारी फुले कार्तिकी हा वाण लागवडीसाठी प्रसारीत केलेला आहे. राजगिरा पिकास साधारणपणे रुपये ५० ते ७० प्रति किलो याप्रमाणे बाजारभाव मिळतो. त्यानुसार हेक्टरी एक लाख २५ हजार पर्यंत आर्थिक उत्पन्न मिळते. या पिकावरील पूर्व मशागत, बियाणे, पेरणी, खते, खुरपणी ,काढणी, मळणी व इतर कामे याबाबतचा खर्च वजा जाता या पिकापासून साधारणपणे एकूण मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाच्या ६० टक्के नफा मिळतो.

राजगिरा लागवड : राजगिरा द्विदल वर्गीय आणि जलद गतीने वाढणारे पीक आहे. पिकाची महाराष्ट्रामध्ये सर्वत्र लागवड केली जाते. या पिकाचे मूळस्थान पूर्व व पश्चिम आशिया व आफ्रिका आहे. अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात ,सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यांत आणि बीड जिल्ह्यामध्ये याची पुष्कळ लागवड करतात. माठ, तांदूळ आणि राजगिरा वनस्पती एकाच वर्गात मोडतात. राजगिरा धान्याचा रंग वेगवेगळ्या जातीनुसार काळा, सोनेरी पिवळा किंवा पिवळसर पांढरा असतो. राजगिरा हरभरा आणि गव्हामध्ये मिश्रपीक म्हणून घेतले जाते. रब्बी हंगामात सलग पीक म्हणून लागवड केल्यास अधिक उत्पादन मिळू शकते.



जमीन : सामू साधारणपणे ६.५ ते ७.५ असावा. अगदीच हलकी. पाणथळ, चोपण व क्षारयुक्त जमीन लागवडीसाठी निवडू नये. जमिनीमध्ये लागवडीपूर्वी जमिनीची खोल नांगरट करून ढेकळे फोडून भुसभुशीत करून एकरी २ ते ३ टन कुजलेले शेणखत मिसळावे. या पिकाच्या वाढीसाठी थंड व कोरडे हवामान उत्तम राहते. सरासरी १० ते ३० अंश सेल्सिअस तापमान असल्यास या पिकाची चांगली वाढ होते. लागवड करताना बियाणे १ ते २ सेंमी पेक्षा जास्त खोल जाणार नाही याची काळजी घ्यावी. त्यामुळे उगवण योग्य वेळेत आणि चांगली होऊन प्रति एकरी आवश्यक रोपांची संख्या मिळते. लागवड करताना दोन झाडांमधील अंतर १५ सेंमी व दोन ओळीमधील अंतर ४५ सेंमी ठेवावे.

बियाणे मात्रा : प्रति हेक्टरी दीड ते दोन किलो बियाणे. सुधारित जाती : अन्नपूर्णा, जी. ए १, सुवर्णा, फुले कार्तिकी या सुधारित जाती आहेत. फुले कार्तिकी जात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित केलेली असून ११० ते १२० दिवसांमध्ये ही जात काढणीसाठी तयार होते. ही जात ५ ते ७ फूट वाढते, पाने हिरव्या रंगाची असतात. कणीस लांबट व पिवळ्या रंगाचे असून, लांबी ४० ते ६० सेंमीपर्यंत आहे. पीक पक्व झाल्यानंतर कणसांची कापणी करावी. कापणीस उशीर झाल्यास दाणे झडतात व उत्पादनात घट होते. सुधारित तंत्राचा अवलंब केल्यास प्रति एकरी ५ ते ६ क्विंटल उत्पादन मिळते.

पेरणी कशी करावी : बियाणे बारीक असल्याने वाळलेली माती मिसळून दीड फुटी पाभरीने (४५ १५ सें.मी. अंतरावर) एक ते दीड सें.मी. खोलीपर्यंत पेरणी करावी.आंतर मशागत: पेरणीनंतर सारे पाडून लगेच हलके पाणी द्यावे. आठ दिवसांच्या आत पिकाची विरळणी करणे अत्यंत गरजेचे आहे, त्यामुळे पिकाची वाढ व्यवस्थित होते आणि रोपांतील योग्य अंतर राखले जाते. पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी लहान रोपांची विरळणी करावी. एक ते दोन वेळा खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी व भुसभुशीत करावी.

कोळपणी नंतर झाडाच्या बुंध्याजवळील मातीच्या भरीमुळे पीक पक्व झाल्यावर पडत नाही. पेरणी नंतर ११० ते १२० दिवसांमध्ये हे पिक काढणीस येते.

खत व्यवस्थापन : माती परीक्षणानुसार हेक्टरी ६० किलो नत्र व ४० किलो स्फुरद तसेच २० किलो पालाश रासायनिक खतांची मात्रा द्यावी. योग्य वेळी देण्यात आलेल्या खतांमुळे पिकाची जलद वाढ होऊन पानांच्या आकार वाढीसाठी फायदा होतो. पीक कालावधी सुमारे साडेतीन ते चार महिने असतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५० : नेपोटियानसने रोममध्ये घुसून स्वतःला सम्राट घोषित केले.
१०९८ : पहिली क्रुसेड आठ महिने चाललेल्या वेढ्यानंतर क्रुसेडरांनी अँटियोक शहर जिंकले.
१५३९ : एर्नान्दो दि सोतोने फ्लोरिडा स्पेनचा भाग असल्याचे जाहीर केले.
१६६५ : जेम्स स्टुअर्टने नेदरलँड्सच्या आरमाराला हरवले.
१८१८ : मराठेशाहीचा अस्त शेवटचे पेशवे बाजीराव हे मध्यप्रदेशातील असीरगढजवळ ढोलकोट येथे जनरल माल्कम याच्या स्वाधीन झाले आणि त्यांनी मराठी राज्य इंग्रजांच्या कडे सोपवले . नंतर इंग्रजानी शनिवार वाड्या वर कब्जा केला आणि तिथे युनियन जॅक फडकला
१८३१ : 'भारतीय महिला विद्यापीठ' या संस्थेची स्थापना. १९२० मध्ये 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' (एस.एन.डी.टी.) असे नामांतर.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध कोल्ड हार्बरची लढाई.
१८८९ : कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेने कॅनडाचे दोन्ही तीर जोडले.
१९१५ : इंग्रज सरकारने रवींद्रनाथ टागोर यांना नाईटहुड ही पदवी बहाल केली.
१९१६ : महर्षी कर्वे यांनी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली.
१९३७ : ड्युक ऑफ विन्डसर व वॉली सिम्पसनचे लग्न.
१९४० : डंकर्कची लढाई जर्मनीचा विजय. दोस्त सैन्याने पळ काढला.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन वायूदलाने पॅरिसवर बॉम्बवर्षाव केला.
१९४३ : झूट सुट दंगे लॉस एंजेल्स नेव्हल रिझर्व आर्मरीतील ६० लोकांच्या टोळक्याने हिस्पॅनिक दिसणार्या लोकांना बडवून काढले.
१९४७ : हिन्दूस्तानच्या फाळणीची मांउंटबॅटन योजना जाहीर झाली.
१९५० : मॉरिस हेझॉंग आणि लुईस लॅचेनल यांनी अन्नपूर्णा या ८,०९१ मीटर उंच असलेल्या शिखरावर प्रथमच यशस्वी चढाई केली.
१९६२ : एर फ्रांसचे बोईंग ७०७ प्रकारचे विमान पॅरिसहून निघताना कोसळले. १३० ठार.
१९६३ : नॉर्थवेस्ट एरलाइन्सचे डी.सी. ७ प्रकारचे विमान ब्रिटिश कोलंबियाच्या किनाऱ्याजवळ कोसळले. १०१ ठार.
१९६८ : अँडी वॉरहोल वर खूनी हल्ला.
१९६९ : व्हियेतनामजवळ ऑस्ट्रेलियाची विमानवाहू नौका एच.एम.ए.एस. मेलबॉर्न व अमेरिकेची विनाशिका यु.एस.एस. फ्रँक ई. एव्हान्सची टक्कर. एव्हान्सचे दोन तुकडे झाले.
१९७३ : सोवियेत संघाचेचे टी.यु. १४४ प्रकारचे विमान फ्रांसमध्ये गुसेनव्हिल जवळ कोसळले. १४ ठार.
१९७९ : मेक्सिकोच्या अखातात इहटॉक १ या खनिज तेलाच्या विहिरीला आग लागली. ६,००,००० टन तेल समुद्रात पसरले.
१९८४ : ऑपरेशन ब्ल्यु स्टार भारतीय सैन्याने आत घुसलेल्या अतिरक्यांना हुसकावण्यासाठी अमृतसरच्यासुवर्णमंदिरावर हल्ला चढवला.
१९८५ : भारत सरकारने पाच दिवसांच्या कार्यदिवस आठवड्याला सुरुवात केली.
१९८९ : थ्येनआनमन चौकात सात आठवडे तळ ठोकलेल्या प्रदर्शकांना घालवण्यासाठी चीनने लश्कर पाठवले.
१९९१ : जपानमधील माउंट उंझेन ज्वालामुखीचा उद्रेक. ४३ पत्रकार व संशोधकांचा मृत्यू.
१९९८ : जर्मनीमध्ये आय.सी.ई रेल्वेगाडी रुळांवरुन घसरली. १०१ ठार.
१९९८ : जमिनीवरील हवेतील लक्ष्यावर मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची द्रोणाचार्य या युद्धनौकेवरून कोचीजवळ यशस्वी चाचणी झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : प्रसिद्ध भारतीय पत्रकार, कादंबरीकार, नाटककार आणि निबंधकार व साहित्यिक बाळकृष्ण भट्ट यांचा जन्मदिन.
१८६५ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी १९३६)
१८६७ : भारतात बालविवाह नियंत्रण कायदा लागू करणारे प्रख्यात भारतीय शैक्षणिक, न्यायाधीश, आणि राजकारणी बिलास सारडा यांचा जन्मदिन.
१८९० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक बाबूराव पेंटर यांचा जन्म (मूत्यू: १६ जानेवारी १९५४)
१८९० : खान अब्दुल गफारखान, सरहद्ध गांधी. (मृत्यू: २० जानेवारी १९८८)
१८९२ : लेखिका तसेच बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९८६)
१८९५ : चीन, इजिप्त आणि फ्रान्समधील राजदूत के.एम. पण्णीक्कर यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९६३)
१९२४ : तामिळनाडूचे १५ वे मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांचा जन्म.
१९३० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म.
१९४१ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाद्धीश न्यायमूर्ती रुमा पाल यांचा जन्मदिन.
१९६६ : पाकिस्तानी क्रिकेट कप्तान जलदगती गोलंदाज वासिम अक्रम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५७ : मानवी शरीरातील रक्ताभिसरणाची क्रिया स्पष्ट करणारे इंग्लिश शरीरशास्त्रज्ञ विल्यम हार्वी यांचे निधन. (जन्म: १ एप्रिल १५७८)
१९३२ : उद्योगपती सर दोराबजी टाटा यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८५९)
१९५६ : स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, राष्ट्रमत आणि स्वतंत्र हिन्दुस्तानचे संपादक, लेखक व नाटककार वामन गोपाळ तथा वीर वामनराव जोशी यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८८१)
१९७७ : आर्चिबाल्ड विवियन हिल, नोबेल पारितोषिक विजेता ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ.
१९८९ : इराणी धर्मगुरू आणि राजकारणी रुहोलह खोमेनी यांचे रनिधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९०२)
१९९० : इंटेल कॉर्पोरेशन चे सहसंस्थापक रॉबर्ट नोयिस यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२७)
१९९७ : चित्रपट व नाट्य अभिनेत्री मीनाक्षी शिरोडकर यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९१६)
२००० : डॉ. आर.एस. अय्यंगार, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे संचालक.
२०१० : अजय सरपोतदार, मराठी चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक.
२०१४ : भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे तिसरे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर

# जिल्हा परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमण तात्काळ हटवावे-शिवसंग्राम

## चालक-मालक संघटनेचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना सादर

बीड। प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जुनी जिल्हा परिषद पर्यंतची जागा तत्कालीन मा.जिल्हाधिकारी व मा.पोलीस अधिक्षक यांनी शिवसंग्राम चालक मालक संघटने अंतर्गत व्यवसायिकांसाठी गाड्या पार्किंगसाठी पर्यायी जागा दिलेली होती.सदरील जागेवर गेल्या अनेक दिवसापासून काही व्यक्तिंनी अनधिकृतपणे अतिक्रमण करून सदर जागा हि चुकीच्या पद्धतीने भाड्याने देऊन हॉटेल,पान टपरी, दुकानाचे भाडे ते वसुल करत आहेत. यामुळे गाडया पार्किंगसाठी दिलेल्या जागेवर अतिक्रमण केल्याने शिवसंग्राम चालक मालक संघटनेच्या अंतर्गत भाडे तत्वावर असणाऱ्या गाड्या हया रोडवर लागत आहेत. त्यामुळे रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक पोलीसांकडून त्यांना नाहक त्रास होत आहे.



याबाबतीत आज शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस तथा शहर प्रभारी अनिल भाऊ घुमरे व शहर उपाध्यक्ष शेषराव तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंग्राम चालक-मालक संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांना निवेदन सादर केले.जिल्हा परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमणे हटवुन शिवसंग्राम चालक-मालक संघटनेच्या भाडेतत्वावर चालणाऱ्या वाहनासाठी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देणेबाबतची विनंती या निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत तात्काळ उचित कार्यवाही अनुसरण्यात येईल असे आश्वासन मुख्याधिकारी यांनी यावेळी दिले. याप्रसंगी शिवसंग्राम चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष संदीप भांबे, उपाध्यक्ष रज्जाक पठाण, मार्गदर्शक शिवाजी वाघमारे जालिंदर पाखरे, नितीन मुंडे विकास गोटे, राजेश चव्हाण,शंकर मोरे,शेख जमील रफिक काझी, बापूसाहेब पवार,संकेत पाळवदे,विनोद वडमारे,विनोद मस्के, सुनील निसर्गंध, प्रभाकर उगले, अभिमान डोंगरे, बंडू मोरे सोनू गुंजाळ, प्रकाश गायकवाड शेख नबी,अमोल सोनवणे मधुकर राऊत, उल्हास बांगर,बाबासाहेब शिंदे, यांच्यासह चालक-मालक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन



हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली- राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिनांक १ ते १५ जानेवारी दरम्यान महाराष्ट्रभर राबविण्यात येणाऱ्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे उद्घाटन येथील शिवाजी महाविद्यालयात बुधवारी ( तारीख एक) रोजी प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. अलीकडच्या काळात तरुण वाचन संस्कृती पासून दुरावत चाललेला असल्याचे आढळून येत आहे त्यामुळे या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालय यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदरील उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेता महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यासोबतच लेखक-वाचक भेट, सामुदायिक वाचन, पुस्तक परीक्षण, वाचन कौशल्य कार्यशाळा, कथाकथन स्पर्धा, सेल्फी विथ बुक आदी उपक्रमाचे आयोजन ही करण्यात येणार असल्याचे ग्रंथपाल डॉ. गणपत पवार यांनी सांगितले आहे. याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. किशोर इंगोले, डॉ. गुणाजी नलगे, डॉ. सुनंदा भुसारे, डॉ. संगीता मुंढे, डॉ. मनीषा गवळी, डॉ. इक्बाल जावेद, डॉ. सुनील कांबळे, डॉ. सुखनंद ढाले, डॉ. सुभाष शेरकर, डॉ. निवृत्ती हुरगुळे, डॉ. बाप्पा जाधव, श्री उत्तम जाधव, श्री विजय पवार आदी उपस्थित होते.

## थोडक्यात



### बागुल क्लिनिकचे आ. हिकमत उढाण यांच्या हस्ते उद्घाटन

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथे सुरू असलेले बागुल क्लिनिकचे स्थलांतर व नूतनीकरण चे उद्घाटन नवीन वर्षानिमित्त दि १ जानेवारी रोजी उदघाटक म्हणूनआमदार हिकमत दादा उढाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी,सुदाम केदार दादा कुलकर्णी, बाप्पा मुकणे,विष्णू महाराज गुरव,डॉ. ज्ञानेश्वर दिवटे,उद्धव नाना मरकड, अनिल दादा सानप, गंगाधर घुले सर, डॉ. ज्ञानदेव जानराव, डॉ. कृष्णकुमार कांबळे,पोलीस उपनिरीक्षक अनिल गायकवाड,बळीराम राऊत, दिगंबर उगले, धनंजय खंदारे, विश्वजीत जगताप, गजानन कोकाटे , संजय खोरे, गोधाजी कापसे,अशोक शहा, बाबासाहेब गोंटे, संतोष जिगे, विठ्ठल धाईत,मुस्तकीम पटेल,डॉ. अनिल वाघमारे,डॉ.अभय जाधव, डॉ. तलवाडकर,शिवाजी बजाज, डॉ. योगेश ढेंबरे, पांडुरंग शिंदे,सूत्रसंचालन ऍड. कृष्णा शर्मा यांनी केले तसेच आभारप्रदर्शन प्रा. उज्वला खोब्रागडे यांनी केले. आता नवीन स्थलांतर मालपाणी कॉम्प्लेक्स शांताई हॉस्पिटल समोर कोर्ट रोड अंबड येथे झाले आहे.

### जीवे मारण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीवर अत्याचार


घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात एका अल्पवयीन मुलीला जिवे ठार मारण्याची धमकी देत एका ३० वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी संशयित तरुणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिल नामदेव शिंदे (रा.विठ्ठलनगर), असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की मागील पाच महिन्यांपासून घनसावंगी तालुक्यातील विठ्ठलनगर शिवारात संशयित आरोपी अनिल नामदेव शिंदे (रा.विठ्ठलनगर) याने शाळेत जात असताना रस्ता अडवून जबरदस्तीने शारीरिक संबंधासाठी दबाव आणला. आरोपीने काही दिवसापूर्वी मोबाईल व पैसे देऊन उसाच्या शेतात नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर हा प्रकार कुणास सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी संशयित तरुणाविरुध्द बाल लैंगिक अत्याचार व इतर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये असून उपनिरीक्षक ए. के ढाकणे अधिक तपास करत आहेत. तर घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव येथेही एका कोचिंग क्लासेसच्या संचालकाने क्लासमधील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले होते.

### ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील ४-५ दिवसांपासून असलेल्या ढगाळ वातावरणामुळे तसेच काही ठिकाणी हलक्या सरी पडल्या असुन काही ठिकाणी पावसाचा शिडकाव झाला आहे त्यामुळे हरभरा पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव झाला असुन या रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी किटकनाशकांची फवारणी करावी लागत असल्याने महागड्या औषधांचा आर्थिक भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे. गेल्या ३-४ दिवसात ढगाळ वातावरण सकाळी धुकं पडत आहे. सध्या हरभ-याला फुले आणि घाट्या लागलेल्या आहेत. घाट्यात अळ्यांचा प्रादुर्भाव झाला आहे.त्यामुळे आता किटकनाशक औषध फवारणीचा खर्च वाढला असल्याचे मुळुकवाडी येथील शेतकरी सुरज बारीकराव ढास यांनी सांगितले.



# जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सेवानिवृत्त कर्मचारी अब्दुल खालेक यांना निरोप

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी तहसील कार्यालयात निवडणूक विभागात कार्यरत असलेल्या कर्मचारी अब्दुल खालेक अब्दुल रज़्ज़ाक यांनी सेवा बजावत ३१ डिसेंबर मंगळवार रोजी वयोमानानुसार ते सेवानिवृत्त झाल त्यानिमित्त जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या उपस्थित मध्ये कार्यालयातील सभागृहात निरोप समारोप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते तहसील दार जीवककुमार कांबळे नायब तहसीलदार बाला प्रसाद धुत सह इतर मान्यवरांनी अब्दुल खालेक यांचा सपत्नीक सत्कार करत त्यांना पुढील आयुष्या बद्दल शुभेच्छा दिल्या तर उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते यांनी अब्दुल खालेक



बद्दल मनोगत व्यक्त करतांना निवडणुक विभागातील एक अत्यंत शांत स्वभाव असलेला कर्मचारी व शासकीय सेवेमध्ये कोणतीही दिरगाई न करता अब्दुल खालेक यांनी स्वतःचे कर्तव्य बजावले असल्याचे बोलत कार्यक्रम स्थळात गौरव केला निरोप समारोप दरम्यान हिंगोली व कळमनुरी येथील सर्वच महसुल कर्मचारीने अब्दुल खालेक यांच्या निरोप समारोपमध्ये सत्कार करत सेवानिवृत्त बद्दल शुभेच्छा दिल्यास यावेळी मोठ्या प्रमाणात महसुल कर्मचारी व परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# माजलगाव शाळेची पात्रूडमधील आदर्श जि.प.मा.शाळेला भेट

## शरीफ दर्गाह आणि निसर्ग सहल संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद शाळेने तालुक्यातील पात्रुड गावाच्या आदर्श जिल्हा परिषद माध्यमिक शाळेला भेट दिली. सोबतच पात्रुड शरीफ येथील दर्गाह हजरत मखदूम शाह वली तसेच निसर्ग सहल उत्साहात पार पडली.

विद्यार्थ्यांना शिक्षणासह इतर उपक्रमातही रस आणि आनंद घेता यावा. त्यांच्या ज्ञानात भर पडावी याकरिता माजलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा नंबर एक ने शाळेची सहल काढली होती. ही सहल पात्रुड या गावात असलेल्या आणि आदर्श शाळा म्हणून लौकिक मिळविलेल्या जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेला भेट देऊन तेथील विविध लॅब ची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी आदर्श जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पात्रूड च्या मुख्याध्यापिका अतहर फातिमा, अफशाबाजी, जुलेखा बाजी, महेवीश बाजी, तय्यब सर, गौस सर, जमील सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच माजलगाव जिल्हा परिषद प्राथमिक नंबर एक उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका सिद्दीकी कौसरबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक पठाण खाजा खान सर, सिद्दिकी अबूबकर सर, मोमीन साजेदाबाजी, शेख सना अंजुम बाजी, रुबीना बाजी, गुलनाज बाजी, यावर सर, समीनाबाजी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेच्या भेटीनंतर ही सहल पात्रुड गावात असलेल्या हजरत मखदूम शहावली यांच्या दर्गाहात गेली आणि निसर्गरम्य वातावरणात ही सहल पार पडली. यावेळी सहलीत समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांनी दोन्ही शाळेतील शिक्षकांच्या अमूल्य मार्गदर्शनाचा ठेवा आपल्या मन मस्तिष्क मध्ये साठवून ठेवला आणि निसर्ग सहलीचा मनसोक्त आनंद लुटला.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १ जानेवारी रोजी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून उद्घाटन संपन्न झाले. प्रास्ताविकात ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी उपक्रमाअंतर्गत सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथ प्रदर्शन, लेखक विद्यार्थी संवाद, कथन स्पर्धा आदि कार्यक्रम



आयोजित करण्यात आल्याची घोषणा केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे म्हणाले की, ग्रंथ हे माणसाचे खरे मित्र आहेत. आजच्या मोबाईल फोनच्या युगात वाचनाकडे लोक दुर्लक्ष करत आहेत ते योग्य नाही. वाचनाने ज्ञान मिळते व विचार प्रगल्भ बनतात म्हणून विशेषतः युवकांनी दररोज नियमितपणे वाचन केले पाहिजे. कार्यक्रमात महाराष्ट्र चरित्र ग्रंथमालेतील ग्रंथांचे सामुहिक वाचन करण्यात आले. उपक्रमात एकूण ७३ वाचकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. न. पु. काळे यांनी केले.

आभारप्रदर्शन डॉ. हमराज उईके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. शरद पवार, डॉ. दिलीप गिऱ्हे, डॉ. विनोदचंद्र पवार, डॉ. तानाजी आगळे, डॉ. सय्यद शानूर, प्रा. प्रदीप मांजरे, प्रा. दिलीप वाघमारे, ग्रंथालय कर्मचारी अंगद दराडे, शरद गव्हाणे, दिलीप डाके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## व्याख्यानास बहुसंख्येने उपस्थित रहा -प्रा.गाडेकर

बीड। प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समीती बीड यांच्या वतीने शुक्रवार दि.०३ जानेवारी २०२५ रोजी सायं.ठिक ०६:०० वाजता. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमीत्ताने प्राचार्य प्रो.डॉ.दुष्यंत कटारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आलेले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदिप रोडे हे तर प्रमुख पाहुणे म्हणुन विष्णु देवकते, संदिप उपरे, अर्जुन राठोड, भगवान माने हे उपस्थित राहतील. या व्याख्यानास बीड शहरातील बहुजन चळवळीतील सर्व कार्यकर्ते व जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष प्रा.राजेंद्र गाडेकर,उपाध्यक्ष गजानन चित्रे,सचीव मधुमती दुगम,कार्याध्यक्ष सुनील बळवंते,कोषाध्यक्ष राजु शिंदे व सदस्य किशोर राऊत, बबन पांचाळ, प्रा.दिनेश राऊत यांनी केले आहे.

## ई- केवायसीसाठी शिबिराचे आयोजन करा- महमद खमरोद्दीन

बीड। प्रतिनिधी

रेशन प्रणातील कार्डधारकांना आता केंद्र शासनाने ई - केवायसी करण्याची सक्ती केली आहे ई - केवायसी केली नाही तर धन्य बंद होणार असल्याने नागरिकांनी भीती पोटी ई - केवायसी करण्या करिता रेशन दुकानासमोर रांगा लावल्या आहेत ऐन धन्य वाटप वेळी ई- केवायसी साठी गर्दी होत असल्याने दुकानदाराची गैर सोय होत आहे.

काही ठिकाणी कार्ड धारकाच्या रोशालाही समोर जावे लागत आहे ती अडचण ओळखून दुकानदार व कार्डधारक या दोघांच्या सोयीसाठी पुरवठा कार्यालय मार्फत इ केवायसी शिबिराचे आयोजन करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून घ्यावी अशी मागणी बीड जिल्हा



काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहर अध्यक्ष मोहम्मद खमरोद्दीन यांनी केली आहे केलेल्या कार्ड धारकाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे तांत्रिक अडचणीमुळे वाया जात असल्याने ई- केवायसी करण्या साठी नागरिक पुढे येत नसल्याने चित्र दिसत आहे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी विशेष मोहीम अंतर्गत शिबिरे आयोजित करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्यास कार्डधारकाचा प्रतिसाद मिळून हा उपक्रम नागरिकांना सोयीस्कर ठरेल जिल्हा पुरवठा अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्यास दुकानदार व कार्ड धारक निश्चित ई- केवायसी साठी पुढे येथील व ई- केवायसी मोहीम यशस्वी होईल असे मोहम्मद खमरोद्दीन यांनी निवेदन केले आहे

ठसे उमटत नसल्याने अनेक योजना पासून वंचित : महिला वर्ग वयोवृद्ध नागरिक आणि लहान मुलाच्या आधार प्रामाणिकरण कमालीच्या तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे रेशन धान्य दुकानांमध्ये सुद्धा ई- केवायसी सक्तीची केली आहे याचे आधार होत नसल्याने अशाचे रेशन पुढच्या महिन्यापासून बंद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे शासनाने या वरती काहीतरी तोडगा काढावा अशा भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे

# मुलीने आत्महत्या केल्याप्रकरणी फरार आरोपींना मध्यप्रदेश येथून अटक

अंबड। प्रतिनिधी

अंबड येथे एका मुलीने आत्महत्या केल्याप्रकरणी आरोपी सोहम बळीराम मिंधर २) बळीराम मिधर ३) मनिषा मिंधर ४) दुर्गेश एकनाथ चित्रे (विधीसंघर्ष बालक) यांच्या त्रासाला कंटाळून यातील फिर्यादी यांच्या मुलीने राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या केली वगैरे फिर्यादीवरुन गु.र.क्र. ५४७/२०२४ कलम १०७,१०८,(५) भा.न्या. सं दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचे तपासामध्ये यातील मुख्य आरोपी सोहम बळीराम मिधर यास दिनांक ११/१२/२०२४ रोजी अटक करण्यात आलेली आहे तो सध्या न्यायालयीन कोठडीत असून विधीसंघर्ष बालक याम दिनांक १२/१२/२०२४ रोजी ताब्यात घेतलेले असून त्यास बाल न्यायालय येथे हजर करण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयातील फरार आरोपी नामे बळीराम विठ्ठल मिधर व त्यांची पत्नी मनिषा बळीराम मिधर हे गुन्हा घडलेल्या दिनांक १०/१२/२०२४ रोजीपासून फरार झाले होते ते मिळुन येत नसल्याने त्यांचे शोध कामी पोलीस ठाणेचे तिन विविध पथके नेमुन आरोपीतांचा वेगवेगळया शहरामध्ये शोध घेण्यात येत होता सदर आरोपीतांचा शोध घेत असतांना दिनांक ३१/१२/२०२४ रोजी सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक अमोल गुरले यांना तांत्रीक विश्लेषन व गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, वरील दोन्हो फरारी पती पत्नी हे मथुरा येथून झेलम एक्सप्रेस रेल्वे गाडीने बुऱ्हाणपूरकडे निघालेले आहेत त्यावरुन सपोनि गुरले, पो.हे.कॉ. विष्णु चव्हाण, दिपक पाटील व महिला हे.कॉ. सविता वीर असे अंबड येथुन खाजगी वाहनाने मधुरेकडून पुणेकडे येणाऱ्या झेलम एक्सप्रेसच्या दिशेने निघुन मध्यप्रदेश राज्यातील खंडवा रेल्वे स्थानकात सदर रेल्वे गाडीचे प्रतिक्षा करत थांबले दिनांक ०१/०१/२०२५ रोजी ०९.३० वाजेच्या सुमारास झेलम एक्सप्रेस खंडवा रेल्वे स्थानकात पोहचली असता वरील पथकांनी सदर गाडीमध्ये चढुन खंडवा ते बुऱ्हाणपुर दरम्यान चालू रेल्वे गाडीत आरोपीतांचा शोध सुरु केला संपुर्ण चालत्या गाडीत आरोपीतांचा शोध सुरु असतांना व रेल्वे हो बुऱ्हाणपूर रेल्वे स्थानकात पोहचली असता सदर पथकाने तात्काळ समयसूचकता दाखवुन बुऱ्हाणपुर रेल्वे स्थानकाचे रेल्वे प्रवेशद्वाबाहेर पुन्हा रेल्वेतून उतरुन जाणाऱ्या प्रवाशात वर नमुद आरोपीतांचा शोध घेत असतांना आरोपी नामे बळीराम विठ्ठल मिधर व त्यांची पत्नी मनिषा बळीराम मिंधर दोन्ही रा. बाचेगाव ता.घनसावंगी जि.जालना ह.मु. सुरांगे नगर अंबड हे मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्या संबंधी थाना लालबाग जि.बुऱ्हाणपुर राज्य मध्यप्रदेश येथे नोंद करुन पोलीस ठाणे अंबड येथे आणून अटक करुन मा. न्यायालयाकडून गुन्हयाचे अधिक तपासकामी दिनांक ०६/०१/२०२५ रोजीपर्यंत पोलीस कोठडो रिमांड घेण्यात आलेले असुन गुन्हयाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

सदरची कामगीरी मा.श्री अजय कुमार बंसल पोलीस अधिक्षक , विशाल कृष्णा खांबे उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, मा.श्री सतिश जाधव पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल गुरले सहा. पोलीस निरीक्षक, पो.हे.कों विष्णु चव्हाण, दिपक पाटील, सागर बाविस्कर, महिला पो.हे.कॉ सविता विर, पो. कॉ. अशोक भांगळ यांनी पार पाडलेली आहे.

राज्य लोकतंत्र
शुक्रवार, दि.३ जानेवारी २०२५


# अंभोरा पोलीसांचा चिंचोलीमध्ये छापा; ८६ किलो गांजा जप्त

## चारचाकी वाहनातून नेणार होते विक्रीला

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील चारचाकी वाहनासह ८६ किलो गांजा पकडला. ही कारवाई बुधवारी सकाळी स्थानिक गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांनी केली. चिंचोली येथे ही कारवाई करण्यात आली. यात तब्बल १७ लाख ७७ हजारांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील चिंचोली येथे चारचाकी वाहनात ८६ किलो गांजा ठेवला असून तो विक्रीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. यावर अंभोरा पोलिसाच्या मदतीने याठिकाणी बुधवारी सकाळी छापा टाकला. यात चारचाकी वाहनासह १७ लाख ७७ हजार ६०० रूपयांचा ८६किलो गांजा जप्त केला. पोलिस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी अमृत महादेव इथापे (वय ३१ रा. चिंचोली ता. आष्टी) याच्यावर गुन्हा दाखल करत आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर याच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उस्मान शेख, अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस




निरीक्षक मंगेश साळवे, पोलिस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलिस उपनिरीक्षक सातव, पोलिस हवालदार अशोक दुबाले, दीपक खांडेकर, बाळू सानप सोमनाथ गायकवाड, अर्जुन यादव, संजय जायभाय, गणेश हांगे , सिद्धार्थ मांजरे, शरद पोकळे यांनी केली आहे. पुढील तपास सपोनि मंगेश साळवे करीत आहेत.

# रुई धारूर ग्रामस्थांकडून स्व.देशमुख कुटुंबाला आर्थिक मदतीचा आधार

## एक लाख पाच हजार पाचशे पंचावन्न रुपयाची आर्थिक मदत

किल्ले धारूर/ प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील रुई धारूर येथील नागरिकांनी गावात मदत फेरी काढून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत जमा करून २ जानेवारी बुधवार रोजी मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबांच्या स्वाधीन केली या वेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



केज तालुक्यातील मस्साजोग येथील आदर्श सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या गुन्ह्यामधील आरोपी आणखीही फरार आहेत. या घटनेचे प्रसाद महाराष्ट्राच्या बाहेर पडले. भारताच्या संसदेमध्ये या हप्त्याची वाचा फोडण्यात आली. तरीही आरोपी पोलिसाच्या जाळ्यामध्ये सापडत नाहीत.आरोपीला तात्काळ अटक करावी व देशमुख कुटुंबांना न्याय द्यावा यासाठी रस्ता रोको, जलसमाधी, मूक मोर्चा, जिल्हा बंद असे विविध आंदोलने करण्यात आली. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त होत आहे. या कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी म्हणून धारूर तालुक्यातील रुई धारूर येथील नागरिकांनी एक बैठक बोलावून ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रसंत भगवान बाबांच्या फोटोची विटंबना; पाटोदा येथे निवेदन देऊन निषेध



पाटोदा । प्रतिनिधी

सातेफळ ता केज जिल्हा बीड येथे काल रात्री काही अज्ञात गुंडा कडून राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या नावाने असलेल्या चौकातील बाबांच्या फोटो ची विटंबना जाणून बुजून जातीय तेढ निर्माण करण्यासाठी केली आहे . सदरील घटनेमुळे मोठा जातीय तेढ निर्माण होऊ शकतो तसेच संत भगवान बाबा यांच्या भक्ताच्या भावना दुखावल्या आहेत.तसेच सार्वजनिक शांतता भंग झाली आहे.

तरी पोलिस अधीक्षक बीड ,पोलिस निरीक्षक केज यांनी तातडीने संबंधितावर गुन्हा दाखल करावा. या साठी पाटोदा तालुक्यातील भगवान बाबा भक्त यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत पाटोदा पोलीस स्टेशन येथे निवेदन देऊन. आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. यावेळी पाटोदा तालुक्यातील सर्व भगवान बाबा भक्त हजर होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्याने तालुक्यासह शहराचा विकास खुंटला

## प्रशासन निरंकुश : जनता प्रशासनात दुवा नसल्याने मनमानी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत नसल्याने शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात विकास कामे खोळंबळी आहेत. नगर परिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका दोन रखडल्याने याचा विपरित परिणाम शहर व ग्रामीण भागातील विकासावर होत असल्याचे चित्र दिसत आहे. सर्वसमान जनता, प्रशासन व शासनामधील महत्वाचा दुव नसल्याने मनमानी कारभार वाढला .

सर्वसामान्यांच्या कामांसाठी प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी करतात परंतु निवडणुका नसल्याने नगरपालिका ◀◀ पान ३ वर

### भुक्कड विकासकामांवर आक्षेप घेणारेच नाहीत

नगर परिषद व पंचायत समिती सदस्य सदस्य सातत्याने पाठपुरावा करून विकासकामे मार्गी लावतात. पण निवडणुका नसल्याने अनेक विकासकामे खोळंबली असून नवीन कामे होत नसल्याच्या तक्रारी आहेत. पूर्वी मंजूर असलेली व सध्या सुरू असलेली विकास कामे भुक्कड होत असली तरी आवाज उठवणारा कोणीच नसल्याने याचा फायदा संबंधित अधिकारी व ठेकेदार घेत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत.





# संत भगवानबाबा पुण्यतिथीनिमित्त कांदेवाडी येथे रंगला कुस्त्यांचा फड

## बालाघाट डोंगर परिसरातील काळ्या मातीत घडताहेत उद्याचे महाराष्ट्र केसरी

दिंद्रुड । प्रतिनिधी

ऐश्वर्यसंपन्न श्री. संत भगवानबाबा जयंती महोत्सवानिमित्त कांदेवाडी (ता.धारुर) येथे गेल्या तेरा वर्षांपासून नववर्षाच्या शुभदिनी ०१ जानेवारीला कुस्त्यांची दंगल प्रतिवर्षी संपन्न होते. बुधवारी (दि०१) दुपारी बारा वाजल्यापासून सायंकाळी साडेसहा वाजेपर्यंत या दंगलीचे सामने खेळवले गेले.



राज्यभरातून मल्ल या कुस्तीच्या दंगलीत सहभागी झाले होते. नांदेड, जालना, कोल्हापूर, बीड, परभणी आदी जिल्ह्यातून मल्ल सोमवारी सकाळी कांदेवाडीत दाखल झाले. बालाघाट डोंगर परिसरातील काळ्या मातीत उद्याचे महाराष्ट्र केसरी घडत असल्याचा आनंद असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान यांनी केले. धारूर तालुक्यातील बालाघाट डोंगराच्या परिसरात अनेक पैलवान घडत असल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांपासून नव ◀◀ पान ३ वर

# प्रसेनजित शिंदे ठरला मितीचा बेस्ट चाइल्ड ॲक्टर

## प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी यांच्या हस्ते बक्षिस प्रदान

माजलगाव । प्रतिनिधी

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पार पडलेल्या पुणे येथील मानाच्या अशा मिती आंतरराष्ट्रीय लघूचित्रपट महोत्सव- २०२४ मध्ये डियर रिव्हर (प्रिय नदीस) या लघुपटासाठी चि.प्रसेनजित शिंदे या बाल अभिनेत्याला बेस्ट चाइल्ड ॲक्टरचा बहुमान प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी व आखील भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मोठ्या रकमेच्या चेकसह



, प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

चि.प्रसेनजित शिंदे हा माजलगाव जि. बीड येथील शाळेत इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकत असुन त्याला फार कमी वयात अभिनयाची गोडी लागल्याचे त्याचे वडील व निर्माते भास्करनाना शिंदे यांनी सांगितले ते पुढे बोलताना म्हणाले की, आपल्या मुलाच्या कलागुणाना वाव मिळावा या हेतुने त्यांनी भास्करनाना फिल्म प्रॉडक्शन या निर्मिती संस्थे मार्फत डियर रिव्हर (प्रिय नदीस) या यशस्वी लघुपटाची निर्मिती केली.

या लघुपटाला आतापर्यंत वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात खूप चांगला प्रतिसाद मिळाला असुन या लघूपटाने अनेक पुरस्कारावर आपली छाप सोडली असल्याचे दिग्दर्शक विष्णू उगले यांनी ◀◀ पान ३ वर

# आष्टी नगरपंचायतमधील दोन नामनिर्देशित सदस्यांची आज होणार निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी नगरपंचायत मधील दोन नामनिर्देशित सदस्यांच्या झालेल्या रिक्त जागी दोन सदस्यांची निवड होणार असून आज दि.३ जानेवारी रोजी सकाळी ११.०० वाजता नगरपंचायत येथे यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे..

आष्टी नगरपंचायत च्या सार्वत्रिक निवडणुकी नंतर नामनिर्देशित स्वीकृत सदस्य पदी मिर्झा अस्लम नियामतुल्ला बेग आणि श्रीमती अनिता दादासाहेब गर्जे यांची निवड झाली होती. या दोन्ही सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या दोन्ही नामनिर्देशित सदस्यांच्या जागी दोन सदस्यांचे नामनिर्देशन होणार आहे.. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड नगरपरिषद प्रशासन विभागाने याबाबत आष्टी नगरपंचायत येथे विशेष सभेचे आयोजन केले आहे या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी पाटोदा, श्रीमती नसिमा शेख यांना प्राधिकृत करण्यात आले असून श्री बाळ दत्त मोरे प्रभारी मुख्याधिकारी नगरपंचायत आष्टी हे साहाय्यक अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

# तांबाराजुरी जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांनी भरवला आठवडी बाजार

## कोणी विकले पोहे;तर कोणी विकले दही धपाटे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी मध्ये बुधवार (दि.१) रोजी कोणी वडापाव, शाबू वडे, पोहे विकले,कोणी दही धपाटे विकले तर कोणी आपल्या शेतातील भाजीपाला विकून आठवडी बाजाराचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने यंदाही जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा तांबा राजुरी आयोजित आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले. या बाजारात जवळ - जवळ बारा ते पंधरा हजारापर्यंत उलाढाल झाली.

७८ विद्यार्थी संख्या असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तांबाराजुरी शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी ◀◀ पान ३ वर



# शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी न लावण्यास रस्ता रोको आंदोलन करणार - सचिन लंगडे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कापूस खरेदी केंद्र सीसीआय लोणवळ येथील कापूस खरेदी दररोज सुरू करावी तसेच वडवणी येथील सोयाबीन खरेदी केंद्राला बारदाना (पोते) तात्काळ उपलब्ध करावा. तसेच भारतीय स्टेट बँक व महाराष्ट्र बँके मार्फत शेतकऱ्यांची आडवणुक न करता त्वरीत पिक कर्ज वाटप करावे नसता दि.६ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता बीड परळी हायवे रोड छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेतकऱ्यांना सोबत घेऊन रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा तहसीलदार यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे बाजार समिती संचालक सचिन लंगडे व इतरांनी दिला आहे.

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत असुन कापूस, सोयाबीन खरेदी केंद्र सुरू आहेत पण ते दररोज सुरू नसल्याने शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असुन तसेच शेतकऱ्यांना ◀◀ पान ३ वर

# भूमि अभिलेख कार्यालयाने शेतकरी पिळून काढला

## शासकीय मोजनी करून शेतकऱ्यांना त्यांचे क्षेत्र ताब्यात नाही, पैसा जावून, चकरा मारून शेतकरी परेशान

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालय असून अडचण नसून खोळंबा ठरत आहे. अधिकारी कुठे आहेत हे कर्मचाऱ्यांना माहिती नाही, असा रामभरोशे कारभार या कार्यालयात सुरू आहे. रोज नागरिक कामानिमित्त येतात पण अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसतात. त्यामुळे नागरिकांना वारंवार चक्रा माराव्या लागत आहेत.**

भूमी अभिलेख कार्यालयातून शेत जमिनीच्या मोजणी, जमिनीचे नकाशे, भूसंपादनाची मोजणी, न्यायालयाकडून आदेशानुसार जमिनीच्या मोजण्या, खरेदी विक्री वारसा वाटणी नोंदी व त्या संदर्भातील दाखले नमुने देण्याचे काम केले जाते. जमिनीची मोजणी साठी शेतकऱ्यांना भूमीअभिलेख कार्यालयाची पायरी चढावी लागते पण कामासाठी हेलपाटे मारावे लागतात.गेल्या दहा ते अकरा वर्षापासून ज्यांच्या जमिनींच्या मोजण्या झाल्या आहेत त्यामध्ये बहुअंशी लोकांना त्यांचे इतरांकडे गेलेले क्षेत्र या कार्यालयाने मोजणी करूनपण परत ताब्यात दिलेले नाही. मोजणी झाल्यानंतर पंचाच्या सह्या घेवून हे कर्मचारी तेथून निघून जातात, ज्या शेतकऱ्याच्या जमिनीची मोजणी झालेली आहे ते विचारतात, साहेब माझे गेलेले क्षेत्र कुठे आहे? त्यांना हे महाशय सांगतात की आम्ही आठ दिवसांनी परत येवू आणि तुमचे क्षेत्र काढून देवू पण गेल्या अनेक वर्षांपासून हे लोक अजुन आलेच नाहीत. आपले गेलेले क्षेत्र आपल्या ताब्यात भेटेल ह्या आशेने शेतकरी रोज या कार्यालयाचे उंबरठे

झिजवत आहे. शेतकरी आता नकारार्थी विचार करत आहेत. मोजणी करून पैसा जातो, वेळ जातो, आपले क्षेत्रपण मिळत नाही असा विचार करत त्यांचा शासनाच्या कारभारावरून विश्वास उडत चालला आहे. गेल्या दहा आकरा वर्षा पासून शेतकऱ्यांच्या मोजण्या झाल्या आहेत पण आज तगायत त्यांचे मालकी हक्काचे क्षेत्र म्हणजे जे असून पण कमी भरत आहे ते त्यांना मिळालेले नाही. असीच या कार्यालयाची परिस्थिती राहिल्यास शेतकऱ्यांनी कोणाच्या तोंडाकडे पहावे.

शेतकरी कामा निमित्त जातात. पण काही अधिकारी बाहेर गावावरून ये जा करतात त्यामुळे ते कधी १२ वाजता येतात आणि ४ वाजता निघून जातात. याकडे मायबाप शासनाने लक्ष द्यावे असे जनतेतून बालले जात आहे.

# शासकीय सोयाबीन हमीभाव नोंदणीसाठी ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश –सभापती किरण पाटील

पाटोदा । प्रतिनिधी

शेतकऱ्याच्या मालाला चांगला भाव मिळावा यासाठी सातत्याने आवाज उठवणारे शेतकऱ्यांचे कैवारी आमदार सुरेश आण्णा धस यांनी संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे तसेच संबंधित विभागाकडे मुदत वाढीची मागणी केली होती सदर मागणी ची दखल घेत शासनाकडून हमीभावाने खरेदी करण्यात येणाऱ्या सोयाबीन नोंदणीची तारीख ३१ डिसेंबर २०२४ ची वाढवून ६ जानेवारी २०२५ अशी करण्यात आली असून पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की आपले सोयाबीन धान शासकीय हमीभाव केंद्रावर विक्री करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यात यावी नोंदणी दिनांक ६ जानेवारी २०२५ पर्यंत सुरू आहे. याचा लाभ घ्यावा.

लोकनेते आ.सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नातून कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा मार्फत नाफेड अंतर्गत दि महाराष्ट्र स्टेट को ऑफ मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड मुंबई व महाकिसान संघ कृषी प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड च्या माध्यमातून पाटोदा तालुक्यामध्ये पाटोदा, वैद्यकीनी आणि कुसळंब या तीन ठिकाणी तसेच शिरूर कासार तालुक्यामध्ये शिरूर आणि नागरेवाडी या दोन ठिकाणी सोयाबीन शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील यांनी दिली. याबाबत वृत्त असे की पाटोदा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सोयाबीन या तेल वर्गीय पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते चालू वर्षी पाटोदा तालुक्यामध्ये ४९३१४ हेक्टर आणि शिरूर कासार तालुक्यामध्ये ५९५० हेक्टर क्षेत्रामध्ये सोयाबीनचा पेरा झाला असून उत्पन्न बऱ्यापैकी आहे परंतु दोन वर्षापासून तालुक्यातील शेतकऱ्यांनी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि.३ जानेवारी २०२५ । पान ७

# धनुष्यबाण चिन्हावरून लढविलेल्या सर्व जागा शिवसेना लढवणार!-प्रमोद नाना भानगिरे

**पुणे । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचा खाते वाटपावरून शिंदे गट आणि भाजपामधील सुरू असलेली कुरघोडी आता महानगरपालिका निवडणुकीतही पाहायला मिळणार आहे. राज्यात महायुती सरकार स्थापन केले असले तरी अनेक वाद चव्हाट्यावर येताना दिसत आहेत. त्यातच आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपा मध्ये गेलेल्या नगरसेवकांच्या जागा ह्या आमच्या असल्याचा दावा शिंदे गटाचे शिवसेनेने केला आहे यासंदर्भात शिवसेनेने पुणे शहर प्रमुख नाना बनगिरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपलं मत व्यक्त केलं आहे.

येत्या महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पुणे शहरा, शिवसेनेचे पक्ष बांधणी मोठ्या प्रमाणावर मजबूत झाली असून मागील काळात पुणे महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेच्या धनुष्यबाणावर लढलेल्या सर्व



जागा शिवसेनाच लढवेल अशी भूमिका शिवसेनाप्रमुख नाना भानगिरे यांनी घेतली आहे

नाना भंगीरे काय म्हणाले आहेत

पुणे पुणे शहरात प्रभाग निहाय शिवसैनिकांची बैठक आयोजित करून अनुकूल असणाऱ्या प्रभागात शिवसेनेच्या वतीने मतदारांचा सर्वे सुद्धा केला जात असून इतर पक्षातील कोणतेही नगरसेवक महायुतीतील घटक पक्षात सामील झाले तरी ही राज्य पातळीवर महायुतीचा ठरलेला फॉर्मुला संपूर्ण राज्यात राबविला जाणार आहे येत्या काळात शिवसैनिक काही नगरसेवक व विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात प्रवेश करणार आहेत

ते पुढे म्हणाले संपूर्ण राज्य महायुतीचे म्हणून तिन्ही पक्षात कार्यरत असून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व शिवसेनेचे वरिष्ठ नेते जे ठरवतील त्याचप्रमाणे पुणे शहरात येत्या महानगरपालिकेच्या निवडणुकीला शिवसेना समोर जाणार आहे हेही त्यांनी स्पष्ट केले आहे शिवसेना पुणे शहरात ४० ते ५० जागेवर पूर्वतयारीचा आढावा संघटन बांधणी आणि निवडणुकीच्या अनुषंगाने तयारी करत आहे. असेही त्यांनी सांगितले. यावेळी पत्रकार परिषदेला शिवसेने चे सहसंपर्कप्रमुख अजय बापू भोसले महिला आघाडी प्रमुख सुदर्शनाताई त्रिगुण इत पुणे जिल्हा महिला आघाडी संपर्कप्रमुख गीतांजली ढोणे युवासेना प्रमुख निलेश गिरमे उपशहर प्रमुख सुधीर कुरुमकर संजय डोंगरे सुनील जाधव शहर संघटक शशिकांत पुजारी नवनाथ निवगुणे शिवसेना कार्यकारी सदस्य कौस्तुभ कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

# धूराचे फटाके फोडल्याने कार्ला गडावर संतप्त मधमाशांचा भाविकांवर हल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

वर्षाचा पहिला दिवस असल्याने बुधवारी (दि.१) कार्ला गडावर एकविरा देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. परंतु या गर्दीतील काही हुल्लडबाज आणि अतिउत्साही भाविकांनी धूराचे फटाके फोडल्याने गडावर असलेल्या मधमाशांच्या पोळ्याला इजा झाली आणि संतप्त मधमाशांनी गडावरील भाविकांवर हल्ला चढवला. यामुळे काहीवेळ एकच गोंधळ उडाला होता. मधमाशांच्या या हल्ल्यात काही भाविक किरकोळ जखमी झाले.





प्राप्त माहितीनुसार बुधवारी कार्ला गडावर एकविरा देवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. यात काही भाविक हे पालख्या घेऊन गडावर आले होते. यातील काही भाविकांनी वाद्यांचा जोरजोरात आवाज करीत रंगीत धुराचे फटाके फोडले. यातून पसरलेल्या धुरामुळे लेणीजवळ असलेल्या मधमाशांच्या पोळ्याला धक्का बसला. पोळ्यावरील संतप्त मधमाशांनी भाविकांवर हल्ला चढवला. यामुळे गडावर काहीकाळ भाविकांची धांदल उडाली होती. भाविकांच्या या पळापळीने मधमाश्या आणखीनच पसरल्या. दुपारी साधारण साडेबाराच्या दरम्यान ही घटना घडली. सुदैवाने यात जिवितहानी झाली नाही. परंतु अनेक भाविक जखमी झाले. स्थानिक ग्रामस्थ व एकविरा देवस्थान ट्रस्टच्या सदस्यांनी जखमींना तत्काळ गडावरून खाली आणले आणि प्रथमोपचार केले. काही भाविकांना उपचारासाठी दवाखान्यातही हलविण्यात आले. काही कालावधीनंतर एकविरा मंदिर परिसरातील परिस्थिती पूर्ववत झाली. अतिउत्साही भाविक आणि नियोजनाचा अभावामुळे अशा घटना घडत असतात. त्यामुळे गडावर फटाका बंदीची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी होत आहे.

# पुण्यात महायुतीत वादाची ठिणगी? 'त्या' पाच जागाही शिवसेनेची लढण्याची तयारी

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत महायुती म्हणून लढलेल्या भाजप आणि शिवसेनेत पुण्यात वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष (ठाकरे गट) मधून पाच माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. मात्र, या पक्ष प्रवेशाला शिवसेनेने अप्रत्यक्षपणे विरोध दर्शविली असून या पाच नगरसेवकांच्या जागा शिवसेनाच लढविणार असल्याची घोषणा शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी पत्रकार परिषदेत केली. शिवसेनेचे शहर व जिल्हा संपर्क प्रमुख अजय भोसले यावेळी उपस्थित होते. तर भाजपकडून या प्रवेशाबाबत कोणतीही चर्चा अथवा माहिती दिली नसल्याचे ते म्हणाले. भानगिरे म्हणाले की, राज्यात लोकसभा



आणि विधानसभा निवडणूकीत आम्ही महायुती म्हणून काम केले. गेल्या अडीच वर्षात माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात घेतलेल्या निर्णयामुळे पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले आहे. या दोन्ही निवडणूकांमध्ये ज्यांचा विद्यमान खासदार, आमदार ती जागा त्या पक्षाची असे जागा वाटपाचे सूत्र होते. हेच सूत्र महापालिका निवडणूकांमध्येही कायम असणार आहे. त्यामुळे, २०१७ मध्ये तत्कालीन शिवसेनेने लढविलेल्या जागा आम्ही लढविणार आहोत. जे पाच नगरसेवक भाजपमध्ये जात आहेत त्या जागा ते धनुष्यबाणाच्या चिन्हावर लढले होते. त्यामुळे या जागा शिवसेनेच्या असून या जागा आम्हीच लढविणार असल्याचा दावा भानगिरे यांनी केला आहे.

भाजपची कोंडी ?

जे पाच नगरसेवक भाजपमध्ये जाणार आहेत त्या जागा त्या नगरसेवकांना कायम ठेवण्याचे आश्वासन पक्षाकडून देण्यात आले आहे. मात्र, आता शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत या जागा शिवसेनाच लढविणार असल्याची भूमिका घेतल्याने भाजपची चांगलीच कोंडी झाली आहे. पुण्यात २०१७ मध्ये शिवसेना स्वबळावर लढली असली तरी १० जागा निवडून आल्या होत्या. ज्या जागांवर त्यांनी दावा केला असून पक्षाकडून आणखी ३० जागांची मागणी महायुतीच्या जागा वाटपात केली जाणार आहे. त्यासाठी पक्षाकडून शहरात सर्वे केला जात असून स्थानिक पातळीवर पदाधिकाऱ्यांच्या बैठकाही सुरू असल्याने भानगिरे आणि भोसले यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

# महायुतीला मिळालेल्या नेत्रदीपक यशाबद्दल नवस फेडत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतले आई एकविरा देवीचे दर्शन

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा परिसरातील वेहेरगाव-कार्ला नावाने प्रसिद्ध असणारा गड आहे. या गडावर एकविरा आई आदिशक्ती म्हणून प्रसिद्ध आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वात प्रसिद्ध असे हे देवीचे जागृत देवस्थान मानले जाते. बुधवारी, १ जानेवारी २०२५ नवीन वर्षाची नव्याने सुरूवात करत शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आई एकविरा देवीचे दर्शन घेतले.





'हे नवीन वर्ष महाराष्ट्रासह देशाला सुख समाधानाचे, शेतकऱ्यांना न्याय देणारे असावे. त्यासोबतच सर्वांना आरोग्य, सौख्य, यश आणि विजयलक्ष्मी प्राप्त व्हावी', अशी प्रार्थना यावेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आई एकवीरा देवीच्या चरणी केली. त्यानंतर, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये जे नेत्रदीपक यश महायुतीला मिळाले त्याबद्दल एकविरा मातेचे त्यांनी नवस फेडले आणि श्रीफळ व प्रसाद देऊन त्या नवसाची पूर्तता केली. तसेच डोंगरावरील देवी माता आणि पायथा मंदिर या दोन्ही देवी आईंना साडी-ओटीचा नैवेद्य देखील डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अर्पण केला. देवी संस्थान असलेले हे पायथ्याशी असणारे एकविरा मातेचे पायथा मंदिर म्हणूनही ओळखले जाते.

तिथे आज नवीन वर्षाच्या सुरूवातीला दर्शनासाठी आलेल्या भाविकांची प्रचंड गर्दी होती. परंतु या सर्व गर्दीमध्ये जनतेने खूप चांगले सहकार्य देऊन अतिशय प्रेमाने डॉ. नीलमताई गोऱ्हे यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. लोणावळा पोलिसांनी अगदी चोख व्यवस्था केलेली, असं मतही डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी याठिकाणी व्यक्त केले.

यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष मधुकर पडवळ, उद्योजक अशोक पडवळ, पोलीस पाटील अनिल पडवळ, मंदिर व्यवस्थापक संतोष देवकर, पुजारी तेजस तात्या खिरे आणि सरपंच दत्तात्रय मारुती पडवळ उपस्थित होते.

# सासवड येथे पुलावरून रिक्षा कोसळली; एक गंभीर जखमी

**सासवड । प्रतिनिधी**

पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून खंडोबाचे देवदर्शनासाठी जाताना सासवड-कोंढवा महामार्गावर सासवडजवळ रिक्षा पुलावरून खाली कोसळली. ही घटना बुधवारी (दि. १) सकाळी ११ वाजेच्या सुमारास सासवड हद्दीत घडली. यामध्ये एक महिला गंभीर जखमी झाली तर रिक्षाचालकासह तीन जण यातून बचावले आहेत.



रिक्षाचालक अमित डबेरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून जेजुरीला खंडोबाचे देवदर्शन करण्यासाठी उमेश चव्हाण, अमित डबेरा, प्रमिला चव्हाण, जया चव्हाण आणि शारदा डबेरा (रा. वडगाव बुद्रुक, पुणे) हे रिक्षाने निघाले होती. पुण्यातील वडगाव बुद्रुक येथून खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी आलेली रिक्षा ही सासवड येथील शितोळे गॅरेजनजीक रस्त्याच्या कडेला पुलावरून पडली. जखमींना तातडीने खासगी सासवड येथील रुग्णालयात करण्यात आले आहे.

# खंडणी न दिल्याने तरुणाची दहशत

**पिंपरी । प्रतिनिधी**

झेरॉक्स दुकानदार महिलेकडे दोन हजारांची खंडणी मागितली. मात्र खंडणी देण्यास महिलेने नकार दिला असता एका तरुणाने दुकानाच्या काउंटरवर आणि दुकानासमोरील वाहनांवर लाकडाने मारून नुकसान केले. तसेच परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना मंगळवारी (दि. ३१) बालाजीनगर, भोसरी येथे घडली.

अशोक दुर्गा पवार (वय १९, रा. बालाजीनगर, भोसरी) याला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी ४७ वर्षीय महिलेने एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अशोक फिर्यादी महिलेच्या झेरॉक्स दुकानात आला. त्याने महिलेकडे दोन हजार रुपयांची खंडणी मागितली. मात्र खंडणी देण्यास महिलेने नकार दिला. त्यानंतर अशोक याने दुकानाच्या काउंटरवर आणि दुकानासमोरील वाहनांवर दांडक्याने मारून नुकसान केले. अशोक याच्या दहशतीला घाबरून आजूबाजूचे लोक घरात गेले. त्यानंतर अशोक याने परिसरातील दुचाकी वाहनांची तोडफोड करून नुकसान केले. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

# पुणे जिल्हाधिकारीपदी जितेंद्र डूडी रुजू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून जितेंद्र डूडी यांनी आज पदभार स्वीकारला. यावेळी मावळते जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी त्यांचे स्वागत करून त्यांच्याकडे पदभार सोपवला.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी यापूर्वी सन २०१९ मध्ये सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय तळोदा, नंदूरबार, सन २०१९ ते २०२० या कालावधीत सहायक जिल्हाधिकारी मंचर तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव, पुणे तर सांगली जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सातारा जिल्हाधिकारी या पदावर काम केले आहे.

श्री. डूडी यांच्या सेवा कालावधीत पोषण अभियानातंर्गत ५ व्या राष्ट्रीय पोषण



महिन्यात अधिकाधिक उपक्रम राबवून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यात तृतीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच राष्ट्रीय मतदान दिन २०२४ च्यावेळी पुणे विभागात उत्कृष्ट जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून प्रथम पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नंबर प्लेट लावा; उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे आवाहन

**बारामती । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अशा वाहनांना ही नोंदणी क्रमांकाची पाटी असणे बंधनकारक असणार आहे. तसेच १ एप्रिल २०१९ नंतर खरेदी केलेल्या वाहनांवर उत्पादकामार्फत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यात आल्यामुळे अशा वाहनधारकांना पुन्हा ही नंबर प्लेट लावण्याची आवश्यकता नाही.

नोंदणीकृत वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविणे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. तसेच रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, नंबर प्लेटमध्ये होणारी छेडछाड व बनावटगिरी रोखणे, वाहनांमुळे




होणारे गुन्हे कमी करणे, यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट महत्वाची आहे. सर्व संबंधित वाहनमालकांनी ही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांकाची नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. या कामासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून एम/एस एफटीए एचएसआरपी सोल्युशन प्रा.लि. या कंपनीची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फतच ही नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर कोणत्याही अनधिकृत विक्रेत्याकडून लावलेल्या नंबर प्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये होवू शकणार नाही. ही नंबर प्लेट बसविण्याकरिता ३१ मार्च २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी. अधिक माहितीकरीता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पी- ९१, कल्याणी नगर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मार्ग, बारामती दु.क्र. ०२११२-२४३१११ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे.

# वर्षभरापूर्वी लग्न, शिक्षक दाम्पत्यानं कालव्यात उडी मारुन संपवलं जीवन

**नारायणगाव । प्रतिनिधी**

कौटुंबिक ताणतणावातून वारूळवाडी (ता. जुन्नर ) येथील डिंभा डावा कालव्यात उडी मारून आत्महत्या केलेल्या शिक्षकी पेशातील उच्च विद्या विभूषित चिराग चंद्रशेखर शेळके( वय २८) व त्यांच्या पत्नी प्रा.पल्लवी (वय २४) या शिक्षक दांपत्याचे मृतदेह स्थानिक तरुणांच्या मदतीने शोध घेण्यात नारायणगाव पोलिसांना यश आले आहे. या घटनेमुळे वारुळवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

चिराग शेळके यांनी नारायणगाव येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत तीन वर्ष गणित विषयाच्या अध्यापनाचे काम केले होते.ते विद्यार्थी प्रिय शिक्षक,नाट्य लेखक, कवी सुद्धा होते. त्यांनी लेखन केलेल्या नाटकाचा शालेय जिल्हा स्पर्धेत प्रथम क्रमांक आला होता. ते अतिशय संवेदनशील, शिस्तप्रिय शिक्षक असल्याची माहिती त्यांच्या सहकारी शिक्षकांनी दिली. त्यांच्या पत्नी प्रा.पल्लवी या पुणे येथील एका नावाजलेल्या महाविद्यालयात प्राध्यापिका होत्या.चिराग व प्रा.पल्लवी यांचा एक वर्षांपूर्वी विवाह झाला होता.ते वारूळवाडी (ता. जुन्नर ) येथील अभंग वस्तीत राहत होते. चिराग, त्याची आई व पत्नी असे त्रिकोणी कुटुंब होते. बुधवारी (ता. १) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास चिराग व प्रा.पल्लवी



हे दुचाकी वरून येथील वारूळवाडी - ठाकरवाडी रस्त्यावरील डिंभे डावा कालव्यावरील पुलावर आले होते. त्यांनी दुचाकी पुलावर उभी केली.या वेळी दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर दोघांनीही कालव्यात उडी मारल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी पाहिले. मात्र कालव्यात पाण्याचा प्रवाह असल्याने काही क्षणातच ते दिसेनासे झाले.

शिक्षक दाम्पत्याने कालव्यात उडी मारल्याची माहिती वारूळवाडीचे सरपंच राजेंद्र मेहेर यांनी पोलीस पाटील सुशांत भुजबळ व नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांना दिली.चिराग शेळके यांचा मृतदेह बुधवारी रात्री शोधण्यात यश आले. मात्र अंधार पडल्याने प्रा.पल्लवी यांचा शोध घेता आला नाही. दरम्यान कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसकर यांनी डिंभे डावा कालव्यातील पाणी कमी केले. आज(ता. २) सकाळी नऊ वाण्याच्या सुमारास प्रा.पल्लवी यांचा मृतदेह कालव्यातून बाहेर काढण्यात आला. आज दुपारी दोघांच्या मृतदेहाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर दीप्ती कळबकर यांच्या उपस्थितीत येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आज सायंकाळी चार वाजता त्यांच्या पार्थिवावर येथील वैकुंठ स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.